# केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी नव्या पेन्शन योजनेची घोषणा



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नव्या पेन्शन योजनेची घोषणा केली असून या योजनेला शनिवारी (दि. २४) केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. युनिफाइड पेन्शन स्कीम असे या योजनेचे नाव आहे. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. या योजनेचा जवळपास २३ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाईल तसेच नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३९
www.ramprahar.com

रविवार, २५ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


लाडकी बहीण योजना महिलांचा सन्मान वाढवणारी- मुख्यमंत्री/२

'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

'गब्बर'चा क्रिकेटला अलविदा; शिखर धवनची निवृत्ती/८








पनवेल : भाजपची कोकण विभागीय बैठक शनिवारी पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली. या बैठकीस राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, खासदार धैर्यशील पाटील, माजी खासदार निलेश राणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, आमदार नितेश राणे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, सदस्य बाळासाहेब पाटील, सरचिटणीस विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी खासदारपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल धैर्यशील पाटील यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीकडून अपप्रचार होईल

# नागरिक, कार्यकर्त्यांनी सावध रहावे -ना. रवींद्र चव्हाण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्ह पसरवत जनतेची दिशाभूल केली आणि स्वतःचा फायदा करून घेतला. त्याचप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीतही महाविकास आघाडीकडून अपप्रचार करण्याचा प्रयत्न होईल, अशी टीका राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी शनिवारी (दि.२४) येथे केली तसेच जनतेने आणि कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या थापेबाजीला बळी पडू नये, असे आवाहनही त्यांनी या वेळी आवर्जून केले.

भाजपची कोकण विभागीय बैठक मार्केट यार्ड येथे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. त्यानंतर या संदर्भात मंत्री रवींद्र चव्हाण यांची पत्रकार परिषद झाली.



त्या वेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. या पत्रकार परिषदेस आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील उपस्थित होते.

बैठकीच्या संदर्भात बोलताना बूथ व मंडल स्तरावर उत्कृष्ट काम आणि संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या दृष्टिकोनातून राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांनी मार्गदर्शन केले असल्याचे नामदार रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, सर्वसामान्य माणसाचा विकास हाच ध्यास घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महायुती सरकार सक्षमपणे काम करत आहे. लाडकी बहीण योजना, वयोश्री, अन्नपूर्णा, गरीब कल्याण, स्कॉलरशिप, मुलींना मोफत उच्च शिक्षण, आनंदाची शिधा, नमो शेतकरी, पीएम किसान अशा अनेक योजना प्रत्यक्षात अमलात आणून त्याचा लाभ जनतेला होत आहे, मात्र विरोधक प्रत्येक वेळी या लोककल्याणकारी योजनेत खडा घालण्याचे काम करत आहेत. असे असले तरी या योजना प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहचवण्याचे काम लोकहिताची जबाबदारी म्हणून कार्यकर्त्यांनी करावे.

पूर्वी काँग्रेस सरकार रोटी, कपडा, मकान आणि गरीबी हटाओ असा नारा द्यायची, पण त्यांना ते कधीही शक्य झाले नाही. मोदी सरकार गरीब कल्याण योजना राबवत ८० कोटी नागरिकांना अन्नधान्य देत आहे, पंतप्रधान आवास योजना राबवून लाखो कुटुंबांना घरकुल दिले आहे. या सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून काम केले जात आहे. बारा बलुतेदारांचे प्रश्न सोडविण्याचे आणि प्रत्येक घटकापर्यंत योजना पोहचविण्याचे काम प्रामाणिकपणे केले जात आहे. महायुतीने सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले आहेत, तर महाविकास आघाडी खोटे बोला, पण रेटून बोला या पद्धतीने काम करत आहे, असा टोला मंत्री चव्हाण यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांना लगावला.

बदलापूर बालिका अत्याचारासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर बोलताना, बदलापूर व इतर प्रकरणासंदर्भातील नराधमांच्या कृत्यांचे कोणीही समर्थन करू शकत नाही. सर्व आरोपींना अटक झाली असून ही केस फास्टट्रॅकने होण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे आणि त्या अनुषंगाने सरकार म्हणून भूमिका घेतली असल्याची माहिती मंत्री चव्हाण यांनी दिली.

# 'मविआ' नेत्यांच्या संवेदना मेल्यात!

## आमदार प्रवीण दरेकर यांचे टीकास्त्र



**पोलादपूर : प्रतिनिधी**

एका चिमुरडीवर अत्याचार होतो आणि त्याचे घाणेरडे राजकारण सुरू असून हे निंदनीय आहे. त्याचा आम्ही धिक्कार, निषेध करतो. महाविकास आघाडीतील नेत्यांच्या जाणिवा, संवेदना मेलेल्या आहेत, अशी बोचरी टीका भाजपचे विधान परिषदेतील गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी केली. ते शनिवारी (दि. २४) महाड येथील चवदार तळ्याजवळ आयोजित जाणीव जागर या कार्यक्रमात बोलत होते.

महिला अत्याचारप्रकरणी महाविकास आघाडीच्या नेत्यांची दुतोंडी भुमिका राज्यातील जनतेसमोर उघड करण्यासाठी आणि बदलापूर प्रकरणातील पीडितेला न्याय देण्यासाठी भाजपच्या वतीने जाणीव जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, उपाध्यक्ष जयवंत दळवी, महाड तालुकाध्यक्ष निलेश देवगिरकर, सरचिटणीस अनिल मोरे, महेश शिंदे, उपाध्यक्ष चंद्रजित पालांडे, युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अक्षय ताडफळे, प्रदेश सरचिटणीस मंजुषा कुद्रमोती, तालुका अध्यक्ष मंजुषा जोशी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार दरेकर म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी बदलापूरला झालेल्या घटनेचे राजकारण करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीने केला आहे. लाडकी बहीण योजनेला जो उदंड असा प्रतिसाद मिळतोय त्यामुळे विरोधक धास्तावले असून त्यातूनच त्यांनी बंदचे आवाहन केले होते. त्यांच्या हिंसक प्रवृत्ती निर्माण करण्याला महाराष्ट्रातील जनतेने बळी पडू नये.

कोलकाता येथे एका महिला डॉक्टरवर बलात्कार झाला त्याचा साधा निषेध विरोधी पक्षांनी केला नाही. बदलापूरची झालेली घटना ही दुर्दैवीच आहे. त्याचे समर्थन कुणी करणार नाही, परंतु सरकारने सर्व प्रकारच्या कारवाया केल्या आहेत. आरोपीला अटक केली. **(पान २ वर..)**

## निवडक

### पुण्यात हेलिकॉप्टर कोसळून पायलट किरकोळ जखमी

**पुणे** : जिल्ह्यातील पौड-ताम्हिणी रस्त्यावर कोंढावळे गावाजवळ ग्लोबल हेक्ट्रा कंपनीचे कंपनीचे हेलिकॉप्टर शनिवारी (दि. २४) कोसळले. मुंबई येथून हैदराबादला चाललेल्या या हेलिकॉप्टरच्या अपघातात पायलट किरकोळ जखमी झाला असून त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर तीन प्रवासी स्थिर असल्याची माहिती पौड पोलिसांनी दिली. मुसळधार पाऊस व धुक्यामुळे हा अपघात झाल्याचे वृत्त आहे.

### कोलकाता बलात्कारप्रकरणी सात जणांची पॉलिग्राफ चाचणी

**कोलकाता** : येथील डॉक्टर तरुणीवरील बलात्कारप्रकरणी सीबीआयने तपास सुरू केलेल्या चौकशीत धक्कादायक खुलासे होत आहेत. त्यामुळे सात जणांची पॉलिग्राफ चाचणी करण्यात आली. ज्यांची चाचणी करण्यात आली त्यात मुख्य आरोपी संजय रॉय, माजी प्राचार्य संदीप घोष, त्या रात्री नाईट ड्युटीवर असलेले चार कनिष्ठ डॉक्टर आणि एका स्वयंसेवकाचा समावेश आहे.

# बेपत्ता एजंटपैकी एकाचा मृतदेह गागोद्याजवळ सापडला

■ **दुसऱ्याचा शोध सुरू; घातपाताची शक्यता**



सुमित जैन



अमिर खानजादा

**पेण : प्रतिनिधी**

घरातून खासगी मिटिंगसाठी गेलेले नवी मुंबईतील दोन रिअल इस्टेट एजंट अचानक बेपत्ता झाले होते. त्यांच्या गाडीवर पाली फाट्यावर गोळीबार झाल्याने गाडीत रक्ताचे डाग आणि दोन बंदुकीच्या गोळ्या सापडल्या, मात्र आत कुणीच नव्हते. यातील एक एजंट सुमित जैन याचा मृतदेह पेण-खोपोली रोडवर गागोदे गावाच्या हद्दीत सापडला आहे, तर दुसरा एजंट अमिर खानजादा अजूनही बेपत्ता असल्याने त्याचे नेमके काय झाले? याबाबत गूढ कायम आहे.

नेरूळ येथे राहणारे सुमित जैन व अमिर खानजादा हे दोघे रिअल इस्टेटचे काम करतात. अमिर हा २१ ऑगस्ट रोजी रात्री १०.३०च्या सुमारास सुमितकडे गेला व आपल्याला मिटींगला जायचे आहे, असे सांगून दोघेही खासगी कारने रायगड जिल्ह्यात निघाले. रात्री बराच उशीर झाल्याने घरच्यांनी त्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघांचेही मोबाईल बंद असल्याचे आढळून आले. त्यामुळे कुटुंबियांनी नेरूळ पोलीस ठाणे गाठत मिसिंगची तक्रार दाखल केली.

दरम्यान, सुमित व अमिर यांच्या कारला जीपीएस सुविधा असल्याने या कारचा मागोवा घेत पोलीस मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून पाली फाटा एक्झिटच्या बाजूला कॅफे सागर हॉटेलकडे जाणाऱ्या मार्गावर आले असता त्यांना तिथे त्यांची गोळीबार झालेली कार सापडली, मात्र सुमित व अमिर दोघेही गायब होते. **(पान २ वर..)**

# पनवेलमध्ये भाजपकडून जाणीव जागर

## महिला सुरक्षितता, सक्षमीकरण आणि सबलीकरणाची घेतली शपथ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांच्या सुरक्षिततेची, सक्षमीकरणाची आणि सबलीकरणाची शपथ पनवेलमधील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी (दि. २४) जाणीव जागर करतेवेळी घेतली तसेच तसेच महिलांवर अत्याचार करणाऱ्या विकृत मनोवृत्तीचा मूक निषेध केला.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर शनिवारी जाणीव जागर करण्यात आला. या वेळी भाजपचे शहराध्यक्ष अनिल भगत यांनी, महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध भाजप नेहमीच आवाज उठवतो आणि महिलांना संरक्षण देण्यात नेहमीच अग्रेसर असल्याचे सांगितले. बदलापूरमध्ये झालेली दुर्दैवी



घटना या पुढील काळात घडू नये यासाठी कायदा आणखी कठोर करता येईल का अशा पद्धतीचा विचार शासन करत आहे, मात्र या संवेदनशील विषयाचे विरोधकांकडून राजकारण केले जात असून हे अत्यंत चुकीचे असल्याचे ते म्हणाले तसेच स्त्रियांना सन्मान मिळावा यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन केले.

या वेळी महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका नीता माळी, युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अभिषेक भोपी, पनवेल विधानसभा संयोजक रोहित जगताप, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, सरचिटणीस गौरव कांडपिळे, प्रितम म्हात्रे, गणेश म्हात्रे, रूपेश नागवेकर, संदीप पाटील, अक्षय सिंग, प्रसाद खंदारे, मयुर आंग्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# मासळी सुकवण्यासाठी आता सौर वाळवणी यंत्र



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणातील सुक्या मासळीचे अर्थकारण लक्षात घेता येथील मच्छीमार बांधवांना मासळी वाळवण्यासाठी यंत्रे पुरवण्याचा निर्णय रायगड जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. सौर ऊर्जेवर चालणारी ही यंत्रे विकत घेण्यासाठी शासनाकडून अर्थसहाय्य दिले जाणार आहे. त्यामुळे मासळी सुकवताना येणारे अडथळे दूर होऊन ग्राहकांना आरोग्यदायी सुकी मासळी उपलब्ध होणार आहे.

माकळी सुकवण्यासाठी कोकणातील मच्छीमार अद्यापही आधुनिक यंत्राचा वापर करीत नाहीत. ही मासळी ओट्यावर, रस्त्यावर सुकवली जाते. **(पान २ वर..)**

### किफायतशीर आणि पर्यावरणपूरक

सोलर ड्रायरमुळे कॅचवर सोप्या, किफायतशीर व पर्यावरणपूरक पद्धतीने प्रक्रिया करता येते आणि त्यामुळे अनेक कुटुंबांना फायदा होईल अशी अपेक्षा आहे. विशेषत: मच्छीमार महिला ज्या सुक्या माशांची विक्री करून उदरनिर्वाह करतात त्यांच्यासाठी ते उपयुक्त आहे. मासेमारी समुदायामध्ये उन्हात मासे सुकवणे ही प्रचलित पद्धत असली तरी पाऊस, वारा, ओलावा, धूळ यामुळे उत्पादन खराब होणे यासारखे अनेक तोटे आहेत, ज्यामुळे बुरशीची वाढ होते. ही प्रक्रिया खूप श्रम घेणारी, वेळ घेणारी आहे आणि त्यासाठी मोठ्या क्षेत्राची आवश्यकता आहे.

**"मासे कोरडे करण्याची सुविधा हा सर्वोत्तम उपाय आहे आणि तो नैसर्गिक सुकण्यापेक्षा चांगला आहे. विकसित केलेले सोलर ड्रायर केवळ उर्जेचीच बचत करत नाहीत, तर बराच वेळ वाचवतात, कमी क्षेत्र व्यापतात, उत्पादनाची गुणवत्ता सुधारतात, प्रक्रिया अधिक करतात. हे कोकणातील मच्छीमारांना खूपच सोयीचे यंत्र असून कार्यक्षम आणि पर्यावरणाचेही रक्षण करणारे आहे.**

**-गुरूशांतप्पा हरळय्या,**
**जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी**

**रायगड जिल्ह्यात मत्स्यप्रक्रिया उद्योग नाहीत, येथे साठवणगृहे नाहीत, शीतगृहे नाहीत. जिल्ह्यातील मच्छीमार जी मासळी पकडतात ती ते मुंबईत जाऊन विकतात. त्यामुळे मत्स्यव्यवसायाचा जिल्ह्याचा जीडीपी वाढण्यास येथील मत्स्य व्यवसायाची फारशी मदत होत नाही. येथील मत्स्यव्यवसायाला आधुनिक रूप देण्यासाठी सौर वाळवणी यंत्र ही सुरुवात ठरेल. हे यंत्र घेण्यास इच्छुक असणाऱ्या मच्छीमारांना अर्थसहाय्य देण्यात येईल.**

**-किशन जावळे, जिल्हाधिकारी, रायगड**

# उलवे नोडमध्ये भव्य दहीहंडी उत्सव

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष आणि महिला मोर्चा उलवे नोड यांच्या वतीने मंगळवारी (दि. २७) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. उलवे नोड सेक्टर ९मधील खारकोपर तलावाच्या बाजूला असलेल्या मैदानात या उत्सवाचे सायंकाळी ४ ते १० वाजेपर्यंत आयोजन करण्यात आले आहे.

या दहीहंडी उत्सवात सहा लाख ६६ हजार ६६६ रुपयांची एकूण बक्षिसे असणार असून महिलांसाठीही खास आकर्षक दहीहंडीही असणार आहे. या वेळी प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. अधिक माहितीसाठी ९८२०२२८०८१, ९६६४६४९९५०, ९०८२९८४६९३ किंवा ८१०८५९५९८५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन भाजप उलवे नोड अध्यक्ष विजय घरत, महिला मोर्चा अध्यक्ष योगिता भगत यांनी केले आहे.

# कसळखंडच्या शिवाजीनगरमधील शेकाप, ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल

■ **आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून होत असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन पनवेल तालुक्यातील आणि उरण विधानसभा मतदारसंघातील कसळखंड ग्रामपंचायतीमधील शिवाजीनगर येथील शेतकरी कामगार पक्ष आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी (दि. २४) भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले. या सर्व प्रवेशकर्त्यांचे उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी पक्षात स्वागत केले.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमास भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे,




सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, कसळखंडचे माजी सरपंच अनंत पाटील, अनिल पाटील, पं.स.चे माजी उपसभापती देविदास पाटील, महेंद्र गोजे, महादेव पाटील, प्रफुल्ल मते, दत्तात्रेय गायकर, सुरेश नाईक, हनुमान पाटील, कमलाकर घरत, ज्ञानेश्वर सुर्वे, राम गाताडे, रामचंद्र केदारी, रोहिदास तोंडे, विजय कुरंगळे, महादेव कांबळे, हर्ष जाधव यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी कसळखंडचे माजी उपसरपंच नरहरी घरत, शांताराम घरत, संतोष नाईक, अलका वाघमारे, अर्चना घरत, सविता घरत, वैशाली नाईक यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# ‘लाडकी बहीण’ महिलांचा सन्मान वाढविणारी -मुख्यमंत्री



**यवतमाळ : प्रतिनिधी**

गेल्या दोन महिन्यांत महिलांसाठी अनेक चांगले निर्णय घेतले. महिलांची समाजात, कुटुंबात भागिदारी वाढविण्यासोबत त्यांचा ‘सन्मान’ वाढविण्यासाठी आपण मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. योजनेसाठी आतापर्यंत एक कोटी ४० लाख महिलांनी नोंदणी केली. त्यापैकी एक कोटी सात लाख लाडक्या बहिणींच्या खात्यात आपण रक्कमदेखील जमा केली आहे. राज्यातील शेवटच्या बहिणीचा अर्ज सादर होईपर्यंत नोंदणी सुरूच राहील, असे यवतमाळ येथे लाडक्या बहिणींशी संवाद साधतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या प्रचार प्रसारासाठी येथे आयोजित वचनपूर्ती मेळाव्यात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. जिल्हाभरातून ५० हजारावर लाडक्या बहिणी मेळाव्यास उपस्थित होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचे कार्यक्रमस्थळी आगमण झाल्यानंतर असंख्य लाडक्या बहिणींनी त्यांना राखी बांधून वचनपूर्तीनिमित्त त्यांचे आभार मानले.

कार्यक्रमास मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार भावना गवळी, आमदार किरण सरनाईक, आमदार मदन येरावार, आमदार प्रा.डॉ. अशोक उईके, आमदार डॉ. संदीप धुर्वे, आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार, आमदार नामदेव ससाणे, आमदार इंद्रनिल नाईक, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की आदी उपस्थित होते.

काही दिवसांपुर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांचा महासागर यवतमाळ येथे पाहिला होता. आज देखील स्त्रीची विराट शक्ती दिसून येत आहे. या स्त्री शक्तीला वंदन करण्यासाठी यवतमाळ येथे आलो आहे. ज्या बहिणींची अद्यापही नोंदणी झाली नाही, त्यांची नोंदणी करून त्यांना एकाचवेळी तीन महिण्यांची रक्कम देऊ. प्रत्येक पात्र महिलेची नोंदणी करण्याचे आपले लक्ष्य आहे. योजना सुरळीत सुरू राहण्यासाठी वर्षभरासाठीच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी शंभर टक्के मोफत शिक्षण देण्याचा निर्णय आपण घेतला. गृहिणींचा आर्थिक भार कमी करण्यासाठी वर्षातून त्यांना तीन सिलेंडर मोफत देण्यात येत आहे.

राज्य सरकारने गेल्या काही दिवसात अनेक चांगल्या योजना महिलांसाठी आणल्या. राज्यातील महिलांना विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक सक्षम करण्याचे आमचे धोरण आहे. या माध्यमातून राज्यातील प्रत्येक बहिणीला लखपती होतांना पाहण्याचे स्वप्न आहे. लाडक्या बहिणींसोबतच लाडक्या भावासाठीदेखील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आम्ही आणली. या योजनेतून भावांना महिण्याला ६ ते १० हजारापर्यंत विद्यावेतन दिले जात आहे.

**राज्य शासनाकडून स्त्री शक्तीचा जागर –देवेंद्र फडणवीस**

राज्यातील सर्वसामान्य महिलांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने गेल्या काळात विविध कल्याणकारी योजना आणल्या. या माध्यमातून शासन सातत्याने स्त्री शक्तीचा जागर करत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महिलांना सक्षम करणारी योजना आहे. मुलीच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली. या योजनेतून मुलीला तिच्या १८ व्या वर्षापर्यंत १ लाख रुपये मिळणार आहे. महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलतीचा प्रवास आपण सुरु केला. बचतगटांचा फिरता निधी वाढविला. आठ हजार ५०० कोटी रुपये बचतगटांना दिले. काही दिवसांपूर्वी बदलापुर येथे अप्रिय घटना घडली. अशा घटना होऊ नये यासाठी गैरवर्तनाबाबत प्रत्येक शाळेत मुलींची विचारपुस केली जात आहे.

**एकही लाडकी बहीण वंचित राहणार नाही –अजित पवार**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे चांद्यापासून बांद्यापर्यंत महिला खुष आहेत. योजनेच्या निकषात बसणारी एकही बहीण लाभापासून वंचित राहणार नाही. योजनेतून महिलांना ४५ हजार कोटी रुपये आपण देतोय. ही रक्कम महिलांच्या हक्काची, अधिकाराची रक्कम आहे. या योजनेमुळे शहरी आणि ग्रामीण भागाला गती मिळेल.

राज्यातील ५२ हजार कुटुंबाना वर्षाला ३ सिलेंडर आपण मोफत देतोय. शेतकऱ्यांना मोफत वीज, मुलींना मोफत शिक्षण यासारख्या अनेक योजना राज्य शासनाच्यावतीने सुरु करण्यात आल्या. मुलींशी होणारे गैरवर्तन रोखण्यासाठी शक्ती कायदा आपण केला. राष्ट्रपतींची मंजूरी झाल्यानंतर हा कायदा अंमलात येईल. असे गैरवर्तन करणाऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी आमचीदेखील भावना असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

# विद्यार्थिनी, महिलांच्या सुरक्षेसाठी खोपोली पोलीस ॲक्शन मोडवर

**खोपोली : प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये शाळेत चिमूरड्यांवर झालेल्या अत्याचार प्रकरणानंतर आता खोपोली पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत.



खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी खोपोली शहर आणि ग्रामीण भागातील जि.प.शाळांमधील मुख्याध्यापक आणि संचालकाची बैठक खोपोली पोलीस ठाण्याच्या सभागृहात शनिवारी (दि. २४) आयोजित केली होती. उपस्थित शिक्षकांना शालेय शिक्षण आणि क्रिडा विभागाने दिलेल्या सुचना सांगत शालेय विद्यार्थीनी आणि महिलांच्या सुरक्षतेसाठी पोलीस दल सक्षम उपविभागीय अधिकारी विक्रम कदम यांचे शिक्षकांना असश्वासन दिले आहे.

खोपोली शहर आणि ग्रामीण भागातील जि.प.६७ शाळांमधील मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या बैठक खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या वेळी वरीष्ठ पोलीस निरिक्षक शीतल राऊत,सहाय्यक पोलिस निरिक्षक मनोज ठाकूर, पूजा चव्हाण, खोपोली नगर परिषदेचे उपमुख्याध्याधिकारी गौतम भगळे, खोपोली नगर परिषद पठाण उपस्थित होते.

शाळेच्या मुख्य गेटसमोरील गर्दी टाळण्यासाठी वरीष्ठ पोलिस निरिक्षक शीतल राऊत यांनी मुख्याध्यापकांना सुचना केल्या. शिक्षकांनीही आडचणी पोलीस प्रशासनासमोर सांगितल्या. सर्व शाळा, कॉलेज, महाविद्यालय येथे सीसीटीव्ही कॅमेरे तत्काळ लावण्यात यावेत व सदर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नियमित तपासणी करावी, मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह हे वेगवेगळ्या ठिकाणी असावेत, लहान मुलांना वॉशरूम करिता ने–आण करण्याकरता महिला मदतनीस यांची नेमणूक करावी, सर्व शाळांमध्ये असलेले शिक्षकेतर कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी करून घ्यावी, स्कूल बसमध्ये विद्यार्थीने आण करणे करिता महिला मदतनीस यांची नेमणूक करण्यात यावी, सर्व शाळेमध्ये तक्रार पेटी लावणे आवश्यक आहे व या तक्रार पेटीची नियमित तपासणी करण्यात यावी.

यासोबतच सर्व शाळा, कॉलेजमध्ये सखी सावित्री कमिटी व विशाखा कमिटी तयार करून त्यांच्या नियमित मीटिंग घेण्यात यावेत, शालेय विद्यार्थी यांचेबाबत काही अनुचित प्रकार घडल्यास तात्काळ पोलीस स्टेशन येथे कळवावे, शाळा, महाविद्यालय, कॉलेजमध्ये असणारे महिला शिक्षक यांनी शाळेतील महिला विद्यार्थी यांची नियमितपणे चौकशी करून त्यांना काही अडचण आहे का, याबाबत माहिती घ्यावी, शाळा, विद्यालय, महाविद्यालय कॉलेज येथील स्वच्छतागृह नियमित चेक करून ते सुरक्षित आहेत का याची खात्री करावी, ज्या शाळा महाविद्यालय कॉलेज मध्ये शाळा सुटण्याची व भरण्याची एकच वेळ आहे त्यांनी वेळेत बदल करून विद्यार्थी यांची गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी, शाळा, कॉलेज, महाविद्यालय कॉलेज येथे असणारे पुरुष सफाई कामगार मद्य सेवन करणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच शासन परिपत्राचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले.

## महानिर्मितीचा साक्री–१ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**मुंबई : प्रतिनिधी**

महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री–१ (२५ मेगावॅट), साक्री–२ (२५ मेगावॅट) आणि साक्री–३ (२० मेगावॅट) चा समावेश आहे.

यापैकी साक्री–१ येथे २५ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने इ.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाईन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची वार्षिक वीज निर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. साक्री–१ येथे २५ मेगावाट स्थापित क्षमतेचा हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानिर्मिती अधिकारी–कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. महानिर्मितीचे अध्यक्ष डॉ.पी.अनबलगन यांनी संचालक (प्रकल्प) अभय हरणे आणिचमुचे तसेच मेसर्स गोदरेज एन्ड बॉयसच्या अधिकारी, अभियंत्यांचे अभिनंदन केले आहे.

## चौक तुपगाव येथे महिलांची छेड

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

बदलापूर येथील चिमुरडी मुलींवर लैंगिक अत्याचारांच्या घटना ताज्या असतानाच चौक–वाशीवली रस्त्यावर तुपगाव हद्दीत जाणाऱ्या रस्त्यावर एका महिलेची छेड एका तरुणाने काढून फरार झाल्याने परीसरात भीतीचे सावट पसरले होते.

शुक्रवारी सकाळी आपल्या लहान मुलांना शाळेतून आणण्यासाठी तुपगाव येथील दोन महिला सकाळी ११.३० ते १२वाजेच्या दरम्यान येत असताना एका अज्ञात व्यक्तीने रस्त्याच्या कडेला वाढलेल्या मोठ्या गवतातून बाहेर येऊन एका महिलेचा हात धरला, तर दुसऱ्या महिलेकडे मोबाईलची मागणी केली. अचानक घडलेल्या घटनेने दोघी महिला घाबरल्या, त्यांनी आरडाओरड सुरू केली असता, हा अज्ञात व्यक्ती पळून जाण्यात यशस्वी झाला.

दोन्ही घाबरलेल्या महिलांनी आपल्या घरच्या लोकांबरोबर चौक दूरक्षेत्र पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. चौक पोलिसांनी घडलेल्या ठिकाणी जाऊन तपास करण्यास सुरुवात केली. तेथील सीसीटिव्ही कॅमेरे तपासून फुटेज पडताळणी केली. साधारण असा संशयी माणूस रसायनी रीस येथील भटवाडी येथे राहतो, तो या परिसरात येतो अशी माहिती उपलब्ध झाली. त्यानुसार शनिवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास त्याला पोलिसांनी तिथूनच ताब्यात घेतला. पुढील तपास करण्यासाठी त्याला खालापूर पोलीस ठाण्यात रवानगी करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## ‘मविआ’ नेत्यांच्या संवेदना मेल्यात!

निष्काळजीपणाला जबाबदार धरून अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. आरती सिंग या आयजी दर्जाच्या ज्या आयपीएस महिला अधिकारी आहेत त्यांचे विशेष तपास पथक नेमले. ज्यांनी कसाबला फाशी देण्यास भाग पाडले त्या उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली. ज्या तातडीने गोष्टी करायच्या आहेत त्या सरकारने केल्या आहेत, मात्र या घटनेचे राजकारण नालायक आणि नादान महाविकास आघाडीला करायचे असल्याचा आरोप आमदार दरेकर यांनी केला.

या वेळी दरेकर यांनी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यात घडलेल्या घटनांचा पाढाच वाचला तसेच यांना एवढ्या संवेदना असत्या तर निर्भया निधीसाठी जी वाहने घेतली होती ती या मंत्र्यांनी आपल्या सुरक्षेच्या ताफ्यासाठी वापरली नसती. विजय वडेट्टीवार, सुनील केदार, सुभाष देसाई यांच्या ताफ्यात माझ्या बहिणी, लेकींसाठी जी वाहने आणली होती ती स्वतःच्या सुरक्षेसाठी वापरली. सुप्रिया सुळे यांच्या ताफ्यातही निर्भयाचे वाहन होते. तेव्हाही उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, पण आम्ही कधी आंदोलन, राजकारण केले नाही, असे आमदार दरेकर म्हणाले.

या वेळी आमदार दरेकर यांनी युपीएचे २००४ ते २०१४ या काळात सरकार असताना घडलेल्या घटनांचीही यादी वाचली तसेच एका चिमुरडीवर अत्याचार होतो आणि त्याचे घाणेरडे राजकारण अशा पद्धतीने करायचे हे निंदनीय असून आम्ही त्याचा निषेध करतो. महाविकास आघाडीतील नेत्यांच्या जाणिवा, संवेदना मेलेल्या आहेत. म्हणून जाणीव जागर या खऱ्या संवेदना आम्हाला आहेत. एवढ्या घटना घडून आम्ही कधीच त्याचे राजकारण, आंदोलन केले नाही. अशा गोष्टींचा आपल्या राजकीय लाभासाठी उपयोग करायचा नसतो हे महाविकास आघाडीतील नेत्यांना कळत नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेने यांच्या झोपा उडल्या असल्याने असे बेताल आणि दिशाहीन झाल्यासारखे वागताना दिसताहेत, अशी टीकाही आमदार दरेकर यांनी केली.

## बेपत्ता एजंटपैकी एकाचा मृतदेह गागोद्याजवळ सापडला

दरम्यान, एजंट सुमित जैन यांचा मृतदेह शुक्रवारी पेण–खोपोली मार्गावरील गागोदे गावाच्या हद्दीत रस्त्यावर सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे, मात्र दुसरा एजंट अमिर खानजादा याचा तपास अद्याप लागलेला नाही. घटनास्थळी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल व नवी मुंबई पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## मासळी सुकवण्यासाठी आता सौर वाळवणी यंत्र

या वेळी त्यावर माशा बसलेल्या असतात. अनेक वेळा त्यात माती, खडे मिसळले जातात. यामुळे सुकी मासळी आरोग्यदायी नसते, असे कारण ग्राहक देत असतात. परिणामी सुक्या मासळीला अपेक्षित दरही मिळत नाही. यावर उपाय म्हणून मासळी सुकवण्यासाठी आता सौरउर्जेवर चालणाऱ्या यंत्राचा आविष्कार झाला असून याचे प्रात्यक्षिक नुकतेच अलिबाग येथे जिल्हा रोजगार कार्यालयात झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आले

अनेकांना जेवणात मांसाहार असल्याशिवाय अन्न गळ्याखाली उतरत नाही. पावसाळ्यात ताज्या मच्छीचे दर गगनाला भिडलेले असताना सुक्या मासळीकडे अनेकजण मोर्चा वळवतात. सुकी मासळी अनेक दिवस घरात ठेवता येते. शिवाय तिचे दरदेखील कमी असतात. त्यामुळे महिनाभर पुरेल इतकी सुकी मासळी पावसाळा सुरू होण्यापूर्वी अनेकजण घरी साठवून ठेवतात. जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांच्या वाढत्या मागणीनुसार ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेलाच दुकाने थाटलेली दिसतात. त्याचबरोबर उरण मोरा, करंजा, अलिबाग वरसोली, मुरूड एकदरा, आगरदंडा, श्रीवर्धन जीवना बंदर या ठिकाणी मासळीचे मोठे बाजार आहेत. येथील यात्रा, उत्सवांमध्येही सुकी मासळी विकण्यासाठी असते. सुके बोंबील, करली, जवळा आणि सुकी मांदेली या मासळीला मोठी मागणी आहे. पावसाळ्यात तर ग्राहकांच्या संख्येत २० ते २५ टक्क्यांनी वाढ झालेली असते, परंतु ही मासळी उघड्यावर सुकवलेली असल्याने त्यात जीवजंतु असण्याची जास्त शक्यता असते.

सेंच्युरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंटमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या गटाने राज्यातील किनारी गावांमध्ये मच्छिमारांसाठी पर्यावरणपूरक सौर कोरडे यंत्र तयार करण्यासाठी ॲल्युमिनियम शीट्स आणि स्टीलच्या ट्रेसह काम केले. यात गरजेनुसार लहान मोठ्या आकारात हे यंत्र उपलब्ध आहेत. याचे प्रात्यक्षिक जिल्हा रोजगार कार्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात दाखवण्यात आले. हे यंत्र वापरण्यास अगदी सोपे असून त्यातून मासळीचा ताजेपणा, चव आणि निर्जंतुकपणा टिकवला जात आहे, असे प्रात्यक्षिक दाखवणाऱ्या कंपनीच्या तज्ज्ञांचे मत आहे.

# पोलादपूर येथे स्पोर्ट्स गणवेशांचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथे काळकाई माता क्रीडा व सामाजिक संस्था कोतवालतर्फे १००१ स्पोर्ट्स गणवेश वाटपाचा उपक्रम कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. या वेळी पोलादपूरचे भुमिपुत्र भाजपचे विधान परिषदेतील गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी प्रमुख अतिथी महाडचे आमदार भरत गोगावले उपस्थित होते. व्यासपिठावर महाड भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामूणकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, शिवसेना सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, पोलादपूर तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, कोतवाल बुद्रुकच्या सरपंच रेखा दळवी, भाजपनेते प्रसन्ना पालांडे, भाजप तालुका अध्यक्ष तुकाराम केसरकर, कृष्णकांत दरेकर, लक्ष्मणबुवा खेडेकर, लक्ष्मण मोरे, पोलादपूर नगरपंचायत अर्थ व नियोजन सभापती अंकिता निकम, प्रकाश दळवी, दत्ता उतेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार दरेकर पुढे म्हणाले, राज्यातील शालेय विद्यार्थ्यांवरील अत्याचाराचे राजकारण करण्याचे धोरण हे विरोधकांचे अपयश आहे. आपण आपल्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता प्रदान करण्यासाठी सीसीटीव्हीसारखी उपकरणे ठेऊन सतर्कता बाळण्याची गरज असल्याचे या वेळी सांगितले. माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमामध्ये रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटना अध्यक्ष श्रीधर जाधव, पोलादपूर नगरपंचायतीचे स्विकृत नगरसेवक शिवराज पार्टे, वकील ॲड. सचिन शिंदे, पर्यटनविषयक प्रबंध सादर करणाऱ्या डॉ. शितल दरेकर, विकसक जमीर धामणकर, कोतवाल बुद्रुक येथे अनेक वर्षांपासून मुख्याध्यापिका म्हणून सेवा करून बदली होऊन गेलेल्या सिंधू अडूरकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण कार्याध्यक्ष पत्रकार शैलेश पालकर, पोलादपूर प्रेस क्लबचे नियोजित अध्यक्ष सचिन मेहता व पत्रकार देवेंद्र दरेकर यांचा सत्कार करण्यात आला.

सुमारे १००१ विद्यार्थी विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते स्पोर्टस गणवेश वाटप करण्यात आले. या वेळी काळकाईमाता क्रीडा सामाजिक विकास संस्थेचे राजेश सकपाळ व अन्य पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. सूत्रसंचालन सचिन दरेकर आणि विजय दरेकर यांनी केले.



## पवन चांडक पनवेलचे नवे उपविभागीय अधिकारी

**पनवेल :** येथील उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांची बदली ठाणे येथे झाली असून त्यांच्या जागी पवन चांडक यांची नियुक्ती पनवेलचे नवे उपविभागीय अधिकारी म्हणून करण्यात आली आहे.



पवन चांडक यांनी पूर्वी पनवेल तहसीलदार म्हणून काम केले आहे. त्यामुळे या परिसराचा अभ्यास त्यांना आहे. नागरिकांना साध्या सोप्या भाषेत समजावून समस्यांचे निराकरण करणारे व्यक्तीमत्व म्हणून चांडक यांची ओळख आहे. चांडक यांना सायकलिंग, ट्रेकिंगची आवड असून काम करताना ते नेहमी हसतमुख असतात. त्यांच्या याच स्वभावाचा फायदा पनवेलच्या नागरिकांना होणार आहे.

**दुखवटा**

## यमुना पाटील



**पनवेल :** साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आण्णाशेठ पाटील यांच्या पत्नी यमुना पाटील यांचे रविवारी (दि. १८) निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि. २७) श्री क्षेत्र नाशिक येथे होणार आहे. उत्तरकार्य शुक्रवारी (दि. ३०) साई येथे राहत्या घरी होणार आहे. तेरावेनिमित्त ह.भ.प. संदीपमहाराज यादव (आसरेवाडी चौक–खालापूर) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.

# निवडक

## तारा येथे आरोग्य शिबिर

**पनवेल :** तालुक्यातील तारा येथील युसुफ मेहर अली सेंटर संचालित रुक्षमणीबेन दिपचंद गार्डी रुग्णालयामार्फत शुक्रवारी (दि. २३) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केळवणे ग्रामपंचायत हद्दीतील शंभर स्त्री



पुरुष रुग्णांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात विविध आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या. डॉ. विद्या धुमाल, हॉस्पिटल व्यवस्थापक अनिल विश्वकर्मा, सामाजिक कार्यकर्त्या मालती म्हात्रे तसेच परिचारिका प्रतिभा मोकल, वेदश्री म्हात्रे, रंजना म्हात्रे, सपना पाटील व मन बहादुर थापा या सर्वांनी शिबिरास भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.

## डेरवलीत दागिन्यांची चोरी

**पनवेल :** घरातील बेडरुममधील लाकडी कपाटाच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना पनवेल तालुक्यातील डेरवली गोकुळ सोसायटीमध्ये घडली आहे. वैशाली शेळके यांच्या रुम नं.४०४ या ठिकाणी असलेल्या घरातील बेडरुममधील लाकडी कपाटाच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेल्या सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास दोन लाख २५ हजार रुपये इतकी आहे. अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अश्लिल वर्तनप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** एका साडे १३ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अश्लिल वर्तन केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या व्यक्तीला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील पळस्पे फाटा येथे राहणाऱ्या सुफियान कुरेशी (वय २८) या तरुणाने अजिवली हायस्कूल समोर राहणार्या एका अल्पवयीन मुलीला घराबाहेर फिरण्यासाठी बाहेर घेवून जावून तिच्याशी जवळीक साधून तिच्या सोबत अश्लिल वर्तन करून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याने याबाबतची माहिती सदर मुलीने आपल्या घरी देताच त्यांनी तातडीने पनवेल तालुका पोलीस स्टेशनला येवून याबाबतची तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सदर आरोपीला ताब्यात घेतले आहे.

## नवीन पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** क्रेडिट कार्ड वर घेतलेले लोन परत करण्यासाठी पैसे नसल्यामुळे त्या टेन्शनमध्ये घरामध्ये कोणाला काहीही न सांगता घरातून निघून गेलेले सेक्टर ५, नवीन पनवेल येथे राहणारे मनोज बापू देशमुख हे परत न आल्याने ते हरवले असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्यांची उंची पाच फूट, सहा इंच, रंग गोरा आहे. ते अंगाने सडपातळ असून अंगात अबोली शर्ट आणि ग्रे पॅन्ट घातली आहे. त्यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार नवनाथ नरळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुलाला घेऊन आई बेपत्ता

**पनवेल :** पटरी समोरील झोपडपट्टी, सेक्टर सहा, नवीन पनवेल येथून पतीने मारल्याचा राग मनात धरून पत्नी आपल्या एक वर्षाच्या मुलासह बेपत्ता झाल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. फिरोजा बेगम राजू दास असे महिलेचे नाव असून तिचा रंग सावळा, उंची पाच फूट आहे. तिने अंगात आकाशी कुर्ता आणि काळी लेगीज घातलेली आहे. तिच्या पायात लाल चप्पल आहे. तिच्यासोबत तिचा मुलगा मोंटू, त्याचा रंग सावळा व तो अंगाने सडपातळ आहे. त्याच्या अंगात आकाशी टी-शर्ट आणि हाफ पॅन्ट घातलेली आहे. यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार नवनाथ नरळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सण, उत्सव शांततेत साजरे करा

## पनवेल पोलिसांचे सर्वांना आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

आगामी दहिहंडी व गणेशोत्सव तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व मंडळांनी शांततेत व शासनाच्या आखून दिलेल्या नियमाप्रमाणे साजरा करावा, असे आवाहन परिमंडळ २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना केले.



यावेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील, पो. नि.जगदीश शेलकर, व गोपनीय विभागाचे कुँवर आदी उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करताना सहा.पो.आयुक्त अशोक राजपूत यांनी सांगितले की, सर्व मंडळी धर्मादाय आयुक्त यांच्या कडे गणेश उत्सव मंडळाची व दहीहंडी उत्सव मंडळांची नोंदणी करावी. सर्वांनी ऑनलाईन अर्ज भरणे, जागामालक किंवा ग्रामपंचायत यांच्याकडे मंडपासाठी परवानगी घेणे, तात्पुरता विद्युत कनेक्शन घेणे, स्टेज अथवा मंडप मजबूत असावे याबाबत तज्ञ अथवा अभियंता यांच्याकडून तपासणी करून घ्यावी., ध्वनी प्रदूषण संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, मिरवणुकीत रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेणे, सर्व संबंधित विभागाच्या परवानगी घेणे बंधनकारक आहे, मंडळाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक किंवा स्वयंसेवक नेमणे, नवी मुंबई पोलीस व्हाट्सप सर्वांनी फॉलो करावे. तसेच सायबर क्राईम जनजागृतीच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना मार्गदर्शन केले आहे.

## सुरक्षारक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनीतील बीपीसीएलमध्ये सुरक्षा रक्षक हा सुरक्षा कर्तव्य बजावत असतांना त्याला हृदयविकाराचा झटका आल्याने चक्कर येऊन खाली पडला. या वेळी बीपीसीएलच्या कामगारांनी त्याला औषध उपचारासाठी चौक ग्रामीण रुग्नालयात घेऊन गेले असता डाक्टरांनी तपासून त्यास मयत झाल्याचे घोषित केले.

या मयत व्यक्तीचे गोरखनाथ घनशाम खोत (वय ५५) असे नाव असून तो सध्या खाने आंबिवली येथे भाड्याने राहतो.तो मुळचा कवठे महाकाल जि.सांगली येथील आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाणे येथे ३९/२०२४ बी.एन.एस.एस.१९४ प्रमाणे दाखल असून पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई म्हामुणकर, तपासिक हवालदार पवार अधिक तपास करत आहेत.

## वाहन संगणक प्रणालीवर दुचाकींकरिता नवीन मालिका

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्या अधिकार कक्षेमध्ये वास्तव्य करणाऱ्या वाहन या संगणक प्रणालीवर परिवहनेत्तर संवर्गातील दुचाकी वाहने नोंदणी करू इच्छिणाऱ्या धारकांसाठी एमएच ४६ सीटी ही नवीन मालिका सध्याची सुरू एमएच ४ सीएस मालिका संपल्याबरोबर सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४ (अ) अन्वये नवीन नोंदणी मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करुन आरक्षित करण्यासाठी इच्छूक जनतेकडून २६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज स्विकारले जातील अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल जयंत पाटील यांनी दिली आहे. तसेच प्रतिनिधी असतील तर प्राधिकार पत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

आकर्षक व पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी केलेले अर्ज मंजूर झाल्यास अर्जदाराने त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेमध्ये विहीत केलेले शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. शासनाने अधिसूचित केलेल्या आकर्षक वाहन नोंदणी क्रमांकासाठी शासनाने विहीत केलेले शुल्क बसूल करुन आकर्षक व पसंतीचे क्रमांक देण्यात येतील. जर एका नोंदणी क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यास पसंती क्रमांक लिलाव पध्दतीने जारी करण्यात येईल.

लिलाव पध्दतीने पसंती क्रमांक जारी करण्यासाठी जो पसंती वाहन क्रमांक पाहिजे आहे त्या नंबरसाठी विहीत रक्कमेचा असलेला डी. डी कार्यालयात जमा करावा व लिलावासाठी वेगळ्या ऐच्छिक रक्कमेचा डी.डी बंद लिफाफ्यात २६ ऑगस्ट २०२४ रोजी १ वाजेपर्यंत जमा करावा, दोन्ही डी.डी जमा केल्यानंतर दि.२६ ऑगस्ट २०२४ रोजी दु. ४ पर्यंत अर्जदारांची बंद पाकीटे त्यांचेसमक्ष उघडण्यात येतील. ज्यांचा ऐच्छिक रक्कमेचा डी. डी जास्त रक्कमेचा असेल त्यांना पसंती क्रमांक देण्यात येईल.

आकर्षक/पसंतीच्या नोंदणी क्रमांकाची शुल्क भरणा दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत संबंधित क्रमांक आरक्षित राहील. त्या कालावधीत वाहनाची नोंदणी न केल्यास ३० दिवसानंतर सदर क्रमांक अनारक्षित समजला जाईल व भरलेले शुल्क परत केले जाणार नाही. आकर्षक पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर क्रमांक आरक्षित केला आहे, याबाबतची पावती कार्यालयाकडून दिले जाईल. व ती पावती वाहन नोंदणी करताना फॉर्म क्रमांक २० सोबत जोडणे आवश्यक आहे.

आकर्षक व पसंतीच्या नोंदणी क्रमांक महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४(अ) नुसार आरक्षित केल्यानंतर सदर आरक्षण क्रमांक हस्तांतरणीय नसल्याने अन्य व्यक्तीच्या नावावर वाहन नोंदणीस्तव हजर केल्यास आरक्षणाचा वापर करता येणार नाही. जर दोन्ही डी डी जमा असल्यास व्यक्ती हजर राहण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीचा डीडी जास्तीचा आहे त्यांना नंबर देण्यात येईल. वाहन पसंती क्रमांक लिलाव प्रक्रिया बाबत अंतिम निर्णय नोंदणी प्राधिकारी यांचे राहतील याची नोंद घ्यावी.

## गव्हाण येथे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते क्लिनिकचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण येथे डॉ. कुणाल म्हात्रे यांच्या स्मित क्लिनिकचा उद्घाटन सोहळा शनिवारी (दि. २४) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. कुणालचे वडील डॉ. अशोक म्हात्रे आणि बहीण तथा महिला उत्कर्ष समिती महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. स्मिता म्हात्रे पाटील यांच्या वैद्यकीय सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. डॉ कुणाल यांनी आपल्या वडिलांच्या वैद्यकीय, पत्रकारिता आणि सामाजिक सेवेचा वारसा पुढे चालवावा असे सांगून स्मित क्लिनिकला शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन समारंभास पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, कोळी बांधव संघटना अध्यक्ष विश्वनाथ कोळी, एचआयएल कामगार संघटनेचे माजी पदाधिकारी गणेश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील, वनप्रेमी योगेश पगडे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य उषा देशमुख, गव्हाण येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा देशमुख, पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे, खजिनदार शैलेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद खारपाटील, नवी मुंबईचे अध्यक्ष नीलेश उपाध्याय याचबरोबर गव्हाण आणि परिसरातील अनेक नागरिक उपस्थित राहून त्यांनी डॉ. कुणाल यांच्या स्मित क्लिनिकला शुभेच्छा दिल्या.






**पनवेल : भाजप युवा मोर्चा ग्रामीण अंतर्गत चिंध्रण पंचायत समिती विभागीय अध्यक्षपदी दीपक रिकामे आणि कार्यकारिणी सदस्यपदी लहू मुंढे यांची निवड झाल्याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या दोघांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी माजी सरपंच तुकाराम पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.**

## रिटघर विद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे शनिवारी (दि. २४) स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्यात आले.



या वेळी योग मार्गदर्शक साहिल सिनारे, राहुल केणी यांनी विद्यालयातील पाचवी ते बारावी अखेर सर्व विद्यार्थ्यांना स्वसंरक्षण विषयी मार्गदर्शन केले. विविध प्रकार घेतले.

साहिल सिनारे, राहुल केणी यांच्या विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. मुलींनी स्वतःचे संरक्षण कसे करावे याविषयी माहिती दिली तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांना घेऊन प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक पाटील सर यांनी केले आणि जोशी सर यांनी आभार मानून प्रशिक्षणाची सांगता झाली.

## फडके विद्यालयात कृष्ण जन्माष्टमी साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

म.ए.सो.संचालित नवीन पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी विद्यालयाने रस्ता सुरक्षा व नियम या विषयावर विशेष लक्ष केंद्रित केले.

विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका तसेच उपस्थित पालक वर्ग यांच्या हस्ते दहीहंडीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी कृष्ण-राधाच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. विद्यार्थ्यांनी विविध रंगतदार सादरीकरणांतून वाहतूक सुरक्षेची महत्त्वाची माहिती प्रभावीपणे उपस्थितांना दिली तसेच सादर केलेल्या नाट्यछटांनी वाहतूक नियमांचे पालन कसे करावे यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमातून नवीन पिढीला सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देण्याचा मानस फडके विद्यालयातर्फे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला.



## वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**उरण : वार्ताहर**

उरणमधील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास विभागातर्फे जिल्हा परिषद शाळा, रानसई येथे ५५ आदिवासी विद्यार्थ्यांना वह्या, अंकल्पी, इतर शालोपयोगी साहित्य व खाऊ वाटपाची एक्सटेंशन एक्टिविटी डॉ. विलास महाले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.



या वेळी देवेंद्र कांबळे, अमित साहू, सुशील कदम, अविनाश भारद्वाज, मयुर चित्ते आदी विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी महाविद्यायाचे प्राचार्य डॉ.पी.जी.पवार याचे मार्गदर्शन लाभले.

## प्राचार्य अरुण घाग यांचा सेवापूर्ती सन्मान

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा झाला.


शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य दशरथ भगत, सुधीर घरत, जेएनपीएचे असिस्टंट मॅनेजर यशवंत पाटील, लाईफ मेंबर चंद्रकांत जाधव तसेच रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी विलास जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे चेअरमन अरुणशेठ जगे हे होते.



३२ वर्षाच्या आपल्या प्रदीर्घ सेवेत प्राचार्य अरुण घाग यांनी आदर्श शिक्षक, प्राचार्य म्हणून उत्तम प्रशासक असा नावलौकिक प्राप्त केला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे, डोळखांब, पिरकोन, करंजा, गव्हाण इत्यादी शाखांमध्ये त्यांनी शिक्षक पर्यवेक्षक आणि प्राचार्य म्हणून काम पाहिले आहे. या जासई विद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांच्या कारकीर्दीत मागील चार वर्षात त्यांनी विद्यालयाची, भौतिक, शैक्षणिक व गुणवत्तेमध्ये भरीव प्रगती केली. या विद्यालयास रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर पारितोषिक, महाराष्ट्र शासनाचा स्वच्छ शाळा-सुंदर शाळा तालुक्यात प्रथम क्रमांक पुरस्कार, उपक्रमशील शाळा पुरस्कार व उपक्रमशील विज्ञान शिक्षिका पुरस्कार, रायगड विभागाय आदर्श विद्यार्थी पुरस्कार, असे अनेक पुरस्कार विद्यालयास आपल्या सहकाऱ्यांच्या सोबतीने प्राप्त करून दिले.

सेवापूर्तीच्या कार्यक्रमास रयत सेवक संघाचे सचिव वमा. अनिल खरात, विजय चव्हाण, विद्यालयाचे व्हाईस चेअरमन डी आर. ठाकूर, रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक किशोर पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, रघुनाथ ठाकूर, प्राचार्य व साहित्यिक ए.डी. पाटील, विविध शाखेतील शाखाप्रमुख व शिक्षक, स्कूल कमिटी सदस्य, सल्लागार समिती सदस्य, सर्व सेवक, शिक्षण प्रेमी नागरिक, विद्यार्थी आणि मित्रपरिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन हरेश पाटील, प्रा. अतुल पाटील, पी. जे. घरत यांनी केले, तर गुरुकुल प्रमुख एस. पी. ठाकरे यांनी आभार मानले.

# ताल से ताल मिला...
## २५ वर्षांनंतरही दिल ये बैचेन वे




झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

गीत, संगीत व नृत्य आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीची जान. अथवा आत्मा आणि आपल्या देशातील जवळपास सर्वच जाती धर्म पंथातील अनेक सणांतील महत्त्वाचा घटक. एक संस्कृतीच! लग्नातही नाचकाम आणि काही समाजात अंत्ययात्रेतही वादन.

गीत, संगीत व नृत्याने भरलेल्या नि भारलेल्या समाजाला अनेक चित्रपट त्यातील गाण्यांमुळे पटकन डोळ्यासमोर येतातच. त्यातील काही चित्रपटातील सर्वच्या सर्व गाणी सर्वकालीन लोकप्रिय. (असं आजच्या मुव्हीजबद्दल आपण बोलू शकत नाही हो. पडद्यावरचा चित्रपट संपतो आणि अनेकदा तरी त्यातील गाणी विसरली जातात.)

मुक्ता आर्ट्‌र्स निर्मित व सुभाष घई दिग्दर्शित ताल (मुंबईत रिलीज १३ ऑगस्ट १९९९)मधील अशीच सर्वच्या सर्व गाणी आजही चित्रपटाला पंचवीस वर्ष होऊनही लोकप्रिय. संगीतकार ए.आर. रेहमानचे संगीत असलेले मणि रत्नम दिग्दर्शित रोजा (१९९२)सारखे मूळ तमिळ भाषेतील चित्रपट हिंदीत डब झाल्याने आपल्यापर्यंत पोहचले. मणि रत्नम दिग्दर्शित बॉम्बे (१९९५)देखील मूळ तमिळ भाषेतील चित्रपट. ए.आर. रेहमानने हिंदी चित्रपटाला संगीत दिलेला सर्वोत्कृष्ट चित्रपट ताल. हा हिंदीत निर्माण होऊन मग तमिळमध्ये डब करण्यात आला.

सुभाष घई हा चित्रपट संगीताचा उत्तम कान व दृष्टी असलेला दिग्दर्शक. आठवा कर्ज, कर्मा, राम लखन वगैरे त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीत व नृत्य. त्याच्या या गुणांवर काहीसा मनोजकुमारचा प्रभाव जाणवतो, माझे हे मत काहींना पटेल अथवा नाहीदेखील. 'कर्ज', 'हीरो', 'कर्मा', 'खलनायक' या चित्रपटातील गाणी एन्जॉय करताना कुठे तरी मनोजकुमार शैली जाणवते...

ताल हा सुभाष घई दिग्दर्शित चित्रपट असला तरी तो पहावासा, ऐकावासा, आठवावासा वाटतो तो ए.आर. रेहमानसाठीच. एखाद्या चित्रपटाच्या दिग्दर्शकावर संगीतकार मात करू शकतो? याचे उत्तर होय असेच द्यायला हवे. (आणखीही असे अनेक चित्रपट आहेत.) पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटात सुभाष घईची आपली एक शैली, आपले स्वतंत्र स्थान, आपलं एक व्हीजन. परदेस या चित्रपटाच्या वांद्र्याच्या पाली हिलवरील आनंद रेकॉर्डिंग स्टुडिओतील मिक्सिंगच्या वेळेस मुलाखतीचा योग आला असता अतिशय फोकस्ड दृष्टिकोनातून आपलं एकेक मत मांडण्याची, आपल्या फ्लॅशबॅकमध्ये जात रंगवून खुलवून एखादी गोष्ट सांगणे ही त्याची पद्धत मला आवडली, पण त्याचा 'परदेस'नंतर प्रभाव ओसरला. 'ताल'मध्ये सुभाष घई टच दिसला नाही. त्यानंतर त्याचा 'उतरता प्रवास' दिसतोय. इंग्लिश मीडियाने त्याला फारच लवकर राज कपूरनंतरचा शो मन म्हटलं (त्या कौतुकाशी राज कपूरच्या दिग्दर्शनाचे चाहते आजही सहमत नाहीत).

'ताल'ची जान आनंद बक्षी यांची गीते व ए.आर. रेहमानचे संगीत यात आहे. सुभाष घईने 'ताल'साठी रेहमानची निवड कशी केली याचाही एक किस्सा आहे. आपल्या 'खलनायक'च्या शूटिंगसाठी बंगळुरू विमानतळावरून हॉटेलमध्ये जात असताना गाडीत 'रोजा'चे लागलेले गाणे ऐकून सुभाष घईने अतिशय कुतूहल म्हणून ड्रायव्हरला विचारले या गाण्याचा संगीतकार कोण? उत्तर ऐकताच सुभाष घईने ठरवले आपण आपल्या एका चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी रेहमानकडे सोपवायची...

रेहमानच्या मते, 'ताल'च्या संगीताने त्याला उत्तर भारतातील चित्रपट संगीत शौकीनांपर्यंत नेले (एक चित्रपट काय काय घडवत असतो आणि त्यातील प्रत्येक जण त्याकडे भिन्न दृष्टिकोनातून पाहतो हेच यातून अधोरेखित होतेय.)

रेहमान शक्यतो रात्रीच्या शांततेत आपली गाणी ध्वनिमुद्रित करतो. एखाद्या कलावंताचे हे वेगळेपण आणि चेन्नईत (पूर्वीचे मद्रास) ते करण्यास प्राधान्य देतो. इश्क बिना (पार्श्वगायक अनुराधा श्रीराम, सुजाता मोहन, रेहमान आणि सोनु निगम), इश्क बिना इश्क बिना (कविता कृष्णमूर्ती व सुखविंदर सिंग), कहीं आग लग जाऐ (आशा भोसले, रिचा शर्मा व आदित्य नारायण), करिये ना (सुखविंदर सिंग व अलका याज्ञिक), क्या देख रहे हो तुम (वैशाली सामंत व शोमा), नहीं सामने तू (रिचा शर्मा व सुखविंदर सिंग), रमता जोगी (सुखविंदर सिंग व अलका याज्ञिक), ताल से ताल मिला (सुखविंदर सिंग, अलका याज्ञिक व उदीत नारायण) ही ताल ची सगळीच गाणी सुपर हिट. या गाण्यांचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरणही देखणे. रमता जोगी या गाण्याचे गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत शूटिंग असतानाच मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना सेटवर शूटिंग रिपोर्टिंगसाठी बोलावले असता काही विशेष गोष्टी दिसल्या. शामक दावरच्या नृत्य शाळेतील विद्यार्थी अनिल कपूर व ऐश्वर्य रॉयच्या सभोवार नृत्य सादर करत होते आणि त्यात एक होता शाहिद कपूर. (यू ट्यूबवर हे गाणे पाहताना तुमच्या हे नक्कीच लक्षात येईल. तोपर्यंत तो कोण आहे याला काहीच ओळख नव्हती). काही वर्षातच तुझे मेरी कसम (२००४) या आपल्या पहिल्या चित्रपटाच्या निमित्ताने रितेश देशमुखच्या मुलाखतीचा योग आला असता तो मला म्हणाला, 'ताल'च्या फिल्मीस्थान स्टुडिओतील शेड्युलला मी सुभाष घईकडे सर्वात तळाचा सहाय्यक दिग्दर्शक होतो...

एक चित्रपट आणि त्यात किती गोष्टी. 'ताल'चे कथालेखन सुभाष घईचे. पटकथालेखन सचिन भौमिक व सुभाष घईचे. संवाद जावेद सिद्दीकीचे, तर संकलनही सुभाष घईचे.

उद्योगपती जगमोहन मेहता (अमरीश पुरी) एका जागेच्या खरेदीसाठी एका गावात गेले असता त्यांचा मुलगा मानव (अक्षय खन्ना) याची नजर पावसात चिंब चिंब भिजून गीत संगीत व नृत्यात रमलेल्या मानसी शंकर (ऐश्वर्य रॉय) हिच्यावर पडते. त्याला ती आवडते... पुढे अनेक वळणे घेत घेत चित्रपट पुढे सरकतो आणि त्यात मानसीच्या आयुष्यात विक्रम कपूर (अनिल कपूर) येतो. प्रेम त्रिकोणाची थीम आपल्यासमोर येते.

ऐश्वर्य रॉयसाठी हा चित्रपट खूपच महत्त्वाचा. विश्व सुंदरीचा मुकुट पटकवणारी ऐश्वर्य काय नि सुश्मिता सेन काय (आणि नंतरच्या सेलिना जेटली, लारा दत्तादेखील आल्याच) या तर प्लॅस्टिकच्या बाहुल्या, यांना अभिनय तो काय येणार नि समजणार असा एक तद्दन फिल्मी समज. तो मोडायचा तर तशी दिग्दर्शकांनी चांगलीच संधी द्यायला हवी. ऐश्वर्याला ती संजय लीला भन्साली दिग्दर्शित हम दिल दे चुके सनम (मुंबईत रिलीज १८ जून १९९९) आणि सुभाष घई दिग्दर्शित ताल या चित्रपटात मिळाली. तिने जणू कात टाकली आणि अभिनेत्री म्हणून स्वतःची ओळख मिळवली. 'ताल' म्हणूनही महत्त्वाचा. छायाचित्रणकार कबीर लालने ऐश्वर्य रॉयचं अद्‌भूत सौंदर्य, तिची मोहकता, प्रसंगानुरूप मादकता आणि तिने साकारलेला अभिनय हे छान पडद्यावर दाखवले.

मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांसाठी स्वतंत्र खेळाचे आयोजन न करता मेन थिएटर मेट्रोत फर्स्ट डे फर्स्ट शोचे बाल्कनीचे तिकीट दिले. आमच्या आजूबाजूचा रसिक प्रेक्षक मला तरी ताल पाहताना फार उत्साही दिसला नाही, कारण चित्रपटच यथातथाच. म्हणून तर यशाला मर्यादा पडल्या. त्यात जान होती ती ए.आर. रेहमानच्या जबरदस्त परफॉर्मन्समध्ये. पाश्चात्य मेलडी, पॉप संगीत व भारतीय लोकसंगीत यांचे फ्युजन त्याने अप्रतिम केले.

मास्टरपीस अल्बम म्हणून 'ताल' ओळखला जातोय... ताल म्हणजे संगीत, संगीत म्हणजे ताल असे आपले म्हणणे ए. आर. रेहमानने कृतीतून दाखवून दिले. नही सामने तू हे आनंद बक्षी यांचे गाणे तसे एकदम साधेच, पण रेहमानने त्याचं जणू सोने केले. सत्तर व ऐंशीच्या दशकातील हिंदी चित्रपट संगीतालाच पुन्हा साकारणे रेहमानला मंजूर नव्हतेच. त्याला असलेले बदलत्या काळाचे भान त्याने कृतीतून घडवले.

ए.आर. रेहमानच्या हिंदी चित्रपटांच्या संगीताचा खूपच मोठा चाहतावर्ग आहे. त्यात त्याचे सर्वोत्कृष्ट पाच हिंदी चित्रपट सांगायचे तर, रामगोपाल वर्मा दिग्दर्शित रंगीला (१९९५), मणि रत्नम दिग्दर्शित दिलसे (१९९८), सुभाष घई दिग्दर्शित ताल (१९९९), आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित लगान (२००१) आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित स्वदेस (२००४) हे चित्रपट.

ताल तर ए.आर. रेहमानसाठीच आठवणीत. विक्रम कपूरच्या भूमिकेसाठी गोविंदाची निवड नक्की झाल्यावर त्यालाच साक्षात्कार झाला की या चित्रपटात अक्षय खन्ना हीरो असून आपण जर ही भूमिका साकारली तर चित्रपटसृष्टीत आरडाओरड होईल की आपण सेकंड हिरोची भूमिका साकारू लागलोय आणि मग अशाच दुय्यम भूमिका आपल्या वाटेला येतील. त्याने पळ काढताच अनिल कपूर सुभाष घईच्या मदतीला धावला. व्यावसायिकता म्हणजे काय हे अनिल कपूरकडून शिकावे.


'ताल'च्या आठवणी या अशा अनेक. पिक्चरला पंचवीस वर्ष पूर्ण झालीदेखील तरी त्याच्या गाण्याचा गोडवा क्या कहने? इश्क बिना क्या जिना यारों...

---



## बाल कलाकारांनी साकारलेले
# श्रीमद् गीत रामायण





महान गीतकार ग.दि. माडगूळकर रचित श्रीमद् गीत रामायण या संगीतमय दृष्यरूपी बाल कलाकारांनी सादर केलेल्या दोन अंकी महानाट्य प्रयोग आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर करण्यात आला. नांदा सौख्य भरे, जय जय श्री स्वामी समर्थ अशा मालिकेतून भूमिका साकारणारी अभिनेत्री अक्षदा नाईक मुख्य निवेदिकेच्या भूमिकेत असून यात सृष्टी शिर्केसह ५० बाल कलाकारांनी उत्कृष्टरित्या अभिनय सादर केला आहे. हे बाल कलाकार पनवेल महापालिकेच्या सर्व शाळेत शिकणारी मराठी व अमराठी विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत तसेच काही नेपाळमधीलही आहेत. या शाळांमधील अचूक अभिनय करणारे विद्यार्थी शोधून काढून, त्यांच्याकडून चार महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर (रिहर्सल) हे महानाट्य रंगभूमीवर आले आहे. यामुळे एक प्रकारे मराठी भाषेत हे नाटक सादर करून या भाषेचा सन्मानच केला आहे.

महाकवी ग.दि. माडगूळकर यांची गीत रामायणातील १२ गाणी या नाटकात समाविष्ट करण्यात आली आहेत. पनवेलचे लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, गीतकार आनंद माडगूळकर, संगीतकार श्रीधर फडके, व्ही.सी. म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन या नाटकास लाभले आहे तसेच पनवेल महापालिकेनेही या बाल कलाकारांसह सर्व कलाकारांचे खास कौतुक केले आहे.

डॉ. गणेश जनार्दन घुगरे यांनी नाटकाचे नेपथ्य, लेखन, दिग्दर्शन केले आहे. या १२ गीतांचे गायन अभिजित धारणे यांनी केले आहे. गीतांचे संगीत नियोजन 'माझ्या नवऱ्याची बायको' व 'फुलपाखरू' या मालिकेचे प्रसिद्ध संगीतकार विशाल राणे यांनी केले आहे. रंगभूषा किशोर पिंगळे व वेशभूषा सहाय्य राज मोरे, शरयू चव्हाण यांची आहे. प्रसिद्धी प्रमुख संतोष धुरी, तर सूत्रधार मंदार काणे असून सहाय्यक दिग्दर्शक मनस्वी व संस्कृती वाशिवाले, नक्षत्र गरुड, स्मृती मुंजाजी आहेत. हे महानाट्य दृश्य स्वरूपात असून यामध्ये रामजन्म ते रावण वधापर्यंतची संपूर्ण रामकथा दाखवली गेली आहे.

नृत्य, ॲक्शन सीन, युद्धाचे प्रसंग यामुळे हे महानाट्य रंजक ठरले आहे. मराठी रंगभूमीवरील संपूर्ण रामायणाचा काळ दर्शविणारा पहिला मराठमोळा महानाट्य प्रयोग सादर करण्यात निर्माते, दिग्दर्शक यशस्वी ठरले आहेत. हे महानाट्य पाहताना अशोक हांडे यांच्या 'मराठी बाणा' या महानाट्याची आठवण होते. हे नाटक लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्व वयोगटातील रसिकांसाठी असून त्याचा आनंद सर्वांनी घ्यावा, असे आवाहन या नाटकाच्या निर्मात्या वृषाली घुगरे यांनी केले आहे. प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यांना तसेच ज्येष्ठांना हे नाटक दाखवावे. मराठी संस्कृती आणि भारतीय वारसा जपणारे श्रीमद् गीत रामायण महानाट्य संगीत रूपाने दृश्य स्वरूपात आपल्यासमोर सादर केले गेले आहे. या नाटकाचे प्रयोग आता वाशी, ठाणे आणि महाराष्ट्रात इतरत्र सादर केले जाणार आहेत.

**-दिलीप रेडकर,** पनवेल

---




# महाराष्ट्रात २५ लाख 'लखपती दिदी' बनविण्याचे उद्दिष्ट

जळगाव येथे २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता राज्यातील लखपती दिदी संमेलन तसेच समुदाय संसाधन व्यक्तींचा सन्मान सोहळा होणार आहे. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील स्वयंसहाय्यता गटांना २५०० कोटी रुपयांचा फिरता निधी व ५००० कोटींचे बँक अर्थसहाय्य वितरणाचाहा कार्यक्रम होणार आहे. ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग महाराष्ट्र शासन उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानांतर्गत हा कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्ताने हा लेख...

उमेद अर्थातच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे ग्रामविकास व पंचायतराज विभाग अंतर्गत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवून त्यांना स्वतःची ओळख निर्माण करून देणारे तसेच नवे क्षितिज, नवा विश्वास निर्माण करून देणारे ग्रामीण महिलांच्या हक्काचे व्यासपीठ होय!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरातील कोट्यावधी लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या ध्येयाकडे एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात २५ लाख लखपती दिदी बनण्याचे कार्य पूर्णत्वास जात आहे. लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत. अभियानातील महिलांना बँकेचे व्यवहार शिकविले जातात त्यांना आर्थिक साक्षर केले जाते. कृषीविषयक माहितीसाठी अभियानात कृषीसखी आहेत, बँकविषयक मदतीसाठी बँक सखी, अशा विविध क्षेत्रात प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्ती अभियानात आहेत तसेच मोठ्या प्रमाणावर कर्ज उपलब्धीसाठी अनेक राष्ट्रीयीकृत बँकाकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते. उमेद अभियानात २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात एकूण ८ हजार ९७४ कोटी रुपये कर्ज वितरण करण्यात आले असून आजपर्यंतच्या इतिहासातील हे सर्वात मोठे कर्ज म्हणूनदेखील गणले गेले आहे.

ग्रामीण भारतातील गरिबीच्या निर्मूलनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात सन २०११मध्ये केली. अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी उमेदमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

उमेद अभियानाच्या या महिला सक्षमीकरणाच्या चळवळीमध्ये आज महाराष्ट्रातील ३४ जिल्हे ३५१ तालुक्यातील जवळपास ६६ लाख कुटुंब सहभागी आहेत. अभियानात आतापर्यंत सहा लाख ४० हजार महिला स्वयंसहाय्यता समूह स्थापन झालेले आहेत. यातील एक लाख २५ हजारापेक्षा जास्त गट हे मागील दोन वर्षात स्थापन झालेले आहेत. ३१,८१२ ग्रामसंघ, १,८७५ प्रभागसंघ, १० हजार ८३ उत्पादक गट आणि ४१०पेक्षाही जास्त शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन झालेल्या आहेत. या संस्थांच्या दैनंदिन सुलभीकरणासाठी गावस्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फळी निर्माण करण्यात आलेली आहे

उमेद अभियानामार्फत महिलांनी रोजगार कसा करावा? कोणता करावा याचे प्रशिक्षण आरसेटीमधून आणि कृषी विज्ञान केंद्र व यासारख्याच विविध तज्ज्ञ संस्थामार्फत प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत प्रशिक्षण कार्यशाळा व प्रशिक्षणवर्ग चालविले जातात. 'आरएसईटीआय'चे प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे कौशल्य वाढविण्याचे कार्य अविरतपणे सुरू आहे. राज्यात १३ लाखपेक्षा अधिक महिला या 'लखपती दिदी' बनल्या आहेत.

व्यवसाय वृद्धीसाठी उमेद अभियानामार्फत विविध प्रकारचे प्रदर्शन स्थानिक पातळीवर भरवून उद्योगांना हक्काची बाजारपेठ तयार करून दिली जाते तसेच विविध स्तरावर महालक्ष्मी सरससारखे प्रदर्शन भरवून ग्रामीण महिलांच्या उद्योगांना जागतिक बाजारपेठ निर्माण करून दिली जाते. त्याचप्रमाणे ग्रामीण महिलांची उत्पादने ग्राहकांना आपल्या घरापर्यंत उपलब्ध व्हावीत यासाठी umedmart.com हे ई-कॉमर्स पोर्टलसुद्धा सुरु करण्यात आले आहे.

उमेद अभियानाची ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची चळवळ आता जोर धरत आहे आणि हे बदल दृश्य स्वरूपात दिसत आहेत. ज्या ग्रामीण भागातील महिला केवळ घर, चूल, मूल यापुरत्या मर्यादित होत्या अशा असंख्य महिला आज अनेक मोठ्या व्यासपीठावर आत्मविश्वासाने आपली मते मांडताना दिसत आहेत तसेच अनेक महिला या स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभा राहून गावाच्या आर्थिक विकासातसुद्धा योगदान देताना दिसत आहेत. डोंगराळ भाग असो की अतिदुर्गम भाग अशा प्रत्येक ठिकाणी आज उमेद अभियानाची महिला स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा निर्माण करत आहे.

उमेद अभियानाच्या महिला आता मसाले, पापड, लोणचे यांच्यासह अनेक खाद्य पदार्थांची निर्मिती करीत आहेत. याशिवाय हस्तकला, कपडे, शोभेच्या वस्तू, शिल्पकलेच्या वस्तू, खेळणी, मातीची भांडी यासारखे अनेक उत्पादने महिला घेत आहेत. राज्यात आज घडीला ग्रामीण महिलांचे शेती आधारित ३८ लाखापेक्षा जास्त उद्योग व्यवसाय सुरू आहेत आणि बिगर कृषी आधारितसुद्धा सात लाख ५६ हजार व्यवसाय सुरू आहेत. येणाऱ्या काळात आमच्या ग्रामीण भागातील महिलांचे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक असणार आहेत.

प्रत्येक गावातील कुटुंबाचा सर्वांगीण विकास साधावा त्याचबरोबर दारिद्र्य निर्मुलनासाठी शासन अनेक योजना राबवत आहे. यासाठी ग्रामीण भागाची प्रगती दारिद्र्य निर्मुलानातून झाल्याशिवाय अशक्य असल्याचे लक्षात आल्यामुळेच केंद्र सरकारने देशभर दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण अजिविका मिशन हा ध्वजांकित कार्यक्रम सुरू केलेला आहे. महाराष्ट्रातसुद्धा हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान नावाने राबविला जात आहे. उमेद अभियान नावाने गावागावात या कार्यक्रमाची ओळख आहे. या अभियानाने व्यापक चळवळीचे स्वरूप धारण केलेले आहे. प्रगतीचा आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून, रोजगार अन् स्वयं रोजगाराच्या नव्या वाटा शोधून उत्तुंग भरारी घेण्यासाठी ग्रामीण महिलासुद्धा आता सर्व क्षेत्रात अग्रेसर दिसत आहेत. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण महिलांच्या आयुष्यात सुख, समाधान आणि नवचैतन्य असण्यामागचे मुख्य कारण उमेद अभियान बनले आहे.

**-गिरीश महाजन,** मंत्री, ग्रामविकास व पर्यटन, महाराष्ट्र राज्य

# जमिनीच्या वादातून सख्या काकाची हत्या

**श्रीवर्धन शहरातील घटना**

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

जमिनीच्या वादातून आपल्या सख्या काकाला जीवे ठार मारण्याची घटना श्रीवर्धन शहरातील नवी पेठ या परिसरामध्ये घडल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. मयत विनोद उर्फ बबन दत्तात्रेय पुसाळकर हे श्रीवर्धन येथील नवी पेठेत राहत होते, तर त्यांचा पुतण्या नितीन गजानन पुसाळकर हादेखील त्या ठिकाणीच राहत होता, मात्र गेल्या अनेक दिवसांपासून दोघांमध्ये जमिनीच्या कारणावरून सतत वादविवाद होत असत. शुक्रवारी सायंकाळीदेखील यांच्यामध्ये वाद झाला व त्याचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले.

आरोपीने मयत व्यक्तीला हनुवटीवर, भुवईवर धारदार शस्त्राने वार करून जीवे ठार केल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी मयत व्यक्तीचे भाचे नंदकुमार गोविंद पाटील राहणार, बोरली पंचतन यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल केल्यानंतर पोलीस हवालदार दयानंद सरकटे यांनी फिर्याद दाखल करून घेतली आहे. याप्रकरणी आरोपी नितीन गजानन पुसाळकर (वय ६०) व ओमकार नितीन पुसाळकर (वय २७, दोघेही राहणार, नवी पेठ, श्रीवर्धन) यांच्यावर गु.र. क्रमांक ६८/ २०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १०३ (१) ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास श्रीवर्धनचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक मुगळीकर व पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत काळे हे करीत आहेत.

# फसवणूक करणाऱ्याला पोलीस कोठडी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील गोयगान भागात राहणारे शिवसेना शिंदे गटाचे मुरूड तालुका संघटक दिनेश मिणमिने यांची फसवणूक करून गेले कित्येक महिने फरार झालेल्या व्यक्तीस अखेर पकडण्यात मुरूड पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. या व्यक्तीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्याला न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दिनेश मिणमिने यांनी राईस मिल मशनरीज आणून देतो म्हणून मोहम्मद दिलशाद अब्दुल रहिम अली राहणार नालगोंडा राज्य तेलंगणा या व्यक्तीने त्यांच्याकडून चार लाख ९२ हजार इतकी रक्कम स्वीकारली होती, परंतु राईस मिलच्या मशिनरीज न आणून देता हा व्यक्ती फरार झाला होता. म्हणून मिनमिने यांनी मुरूड पोलीस ठाणे येथे मार्च महिन्यात त्याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता.

आरोपी हा बाहेरील राज्यातील असल्याने त्याचा शोध लागत नव्हता. मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उदय झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील तसेच पोलीस शिपाई विक्रांत बांधणकर व पोलीस शिपाई किरण कांबळे यांनी तांत्रिक तपासाच्या मदतीने यातील आरोपी यास इगतपुरी, जिल्हा नाशिक येथून ताब्यात घेतले असून त्यास पुढील तपासाकामी अटक करून त्यास न्यायालयात हजर केले असता त्यास दोन दिवसांची पोलीस कस्टडी दिली आहे.

पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील हे करत आहेत. गेले कित्येक महिने हा आरोपी फरार होता, परंतु मोबाईलमुळे त्याला पकडण्यात यश आले आहे.

# शॉक लागून वानराचे पिल्लू जखमी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**



पाली शहरामध्ये वानर व माकडांच्या टोळ्या मोठ्या प्रमाणात फिरत असतात. शुक्रवारी (दि. २३) येथील बाजारपेठेत हॉटेल स्वागत बार समोरील विद्युत खांबावर एक वानराचे पिल्लू व त्याची आई चढली होती. या वेळी या वानराच्या पिल्लाचा विद्युत तारेला हात लागल्याने त्याला जोरदार शॉक बसला व हे वानराचे पिल्लू थेट रस्त्यावर पडले.

या वेळी लोकांनी येथे गर्दी केली होती. जमलेल्या लोकांनी निपचित पडलेल्या वानराच्या पिल्लाच्या अंगावर पाणी टाकल्याने पंधरा ते वीस मिनिटांनी ते हालचाल करायला लागला. या वेळी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना फोन करून तिथे बोलवण्यात आले. वन विभागाचे कर्मचारी तत्काळ त्या ठिकाणी पोहोचले. त्यानंतर वानरांच्या टोळीने त्या शॉक लागलेल्या वानराच्या पिल्लाला उचलून नेले. विभागाचे कर्मचारी या वेळी त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. मात्र त्यानंतर वानराची टोळी त्या पिल्लाला घेऊन निघून गेली. याआधी देखील अनेक माकड व वानरांना विजेचा शॉक लागून ते जखमी झाले आहे, तर काही मृतदेखील झाले आहेत.

वानर व माकडांचा पाली शहरात वाढता उपद्रव व उच्छाद यामुळे पालिकर जनता मेटाकुटीला आली आहे. हे वानर व माकडे घरात घुसून घरातील सामानाची नासधूस करतात तसेच अनेक वस्तूंचे नुकसानदेखील करतात. परिणामी हा उपद्रव टाळण्यासाठी तसेच माकड व वानर देखील सुरक्षित राहण्यासाठी वन विभागाने यासंदर्भात योग्य कार्यवाही करावी अशी मागणी पालीतील सामाजिक कार्यकर्ते विदेश आचार्य यांनी केली आहे.

# रोहेकरांना पावसाचा दिलासा



**धाटाव : प्रतिनिधी**

गेले दहा ते बारा दिवस पावसाने दांडी मारल्यामुळे रोह्यातील नागरिक अक्षरशः उष्णतेमुळे हैरान झाले होते, परंतु काल शुक्रवार सायंकाळपासून पावसाचे संततधार सुरू असल्यामुळे हवेत थोडाफार प्रमाणात गारवा निर्माण झाला आहे. तालुक्यातील बहुतांश भागात पाऊस पडल्यामुळे गरमीचे प्रमाण देखील कमी झालेला आहे.

एकंदरीत तालुक्यातील उष्णतेचा पारा हा जवळपास ३०ओ च्या वरती गेल्यामुळे शाळकरी मुले, कामगार, गृहिणी, वाहकदार, विक्रेते यासह नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. बाजारपेठेत उकाड्यामुळे तुरळ गर्दी सणासुदीच्या काळातदेखील पहायला मिळत होती, परंतु पावसाच्या दमदार हजेरीमुळे नागरिकांसह बळीराजादेखील या पावसामुळे सुखावलेला आहे.

# सोशल मीडियाचे फायदे तोटे समजून घ्यावेत -शिवाजी ढवळे

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यात शाळेत संस्काराचे धडे दिले जात असल्याचे दिसून येत आहे पण विद्यार्थ्यांना सोशल मीडिया वरून अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी पालकांची महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे सोशल मीडियाचे फायदे तोटे समजून घेवूनच मोबाईल मुलांच्या हातात द्यावा, असे आवाहन नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी केले.

नेरळ येथील विद्या विकास शाळेत विद्यार्थ्यांना सामाजिक नितीमूल्य व्यवस्था, विद्यार्थी समुपदेशन आणि मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. या वेळी नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा आसावरी काळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शैलजा निकम, विनया काकडे, विशेष मार्गदर्शक म्हणून संतोष कुमार गुप्ता, अभिमन्यू सिंग, अ‍ॅड. ओंकार भडसावळे तसेच श्रीहरी काळे, पोलीस हवालदार देवेंद्र शिंगारे आदी उपस्थित होते.

शिवाजी ढवळे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मिडियाचे धोक्यांबाबत माहिती देताना ज्यावेळी मोबाईल हातात घेणार त्यावेळी आपल्या बाजूला पालक असतील याची खबरदारी घ्या, असे आवाहन केले तसेच सोशल मीडियावरील कोणतीही साईट उघडताना पालकांना त्याबाबत माहिती द्यावी, असे आवाहन करून पोस्को कायदा काय आहे? याची सविस्तर माहिती दिली.

सायबर सेलमधील तज्ञ संतोष कुमार गुप्ता यांनी मोबाईल चा वापर किती धोकादायक आहे. याची माहिती देताना शाळेत शिक्षकांचे लक्ष विद्यार्थ्यांवर असते, मात्र विद्यार्थी अधिक वेळ आपल्या घरी पालकांसोबत असतो. त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल फोन देताना काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

माजी मुख्याध्यापिका आसावरी काळे यांनी कुटुंब प्रबोधन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यामध्ये आपल्या जीवनातील सहा 'भ' कार कोणते यांचे स्पष्टीकरण केले. सुरुवातीला सामाजिक नितीमूल्य व्यवस्था, विद्यार्थी समुपदेशन याबाबत शिक्षिका बदे यांनी प्रास्ताविक करीत मार्गदर्शन शिबिराचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

# पेण आरटीओ कार्यालयाकडून प्रवेश प्रक्रियेसाठी क्युआर कोड

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जर्मनी देशातील बाडेन-वुटेनवर्ग या राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला, ज्यामध्ये वाहनचालकांचा समावेश असून या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या प्रकल्पानुसार प्रवेश प्रक्रियेबाबतचा अर्ज भरण्यासाठी क्युआर कोड जारी करण्यात आला असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पेण महेश देवकाते यांनी दिली.

मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाच्या अनुषंगाने यंत्रणा, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपद्धती निश्चित केल्यानुसार जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व तांत्रिक समित्या गठित करण्यात आल्या असून परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली वाहनचालक (बस, रेल्वे, ट्रक, हलकी व जड वाहने) या ट्रेडकरिता परिवहन समिती स्थापन करण्यात आली असून शासकीय करारानुसार कुशल वाहनचालक पुरविण्यासाठी जिल्हास्तरावर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे तसेच भरती प्रकियेसंदर्भात आवश्यक माहितीसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पेण कार्यालयाच्या पत्यावर संपर्क साधावा.

# रोहा एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअरच्या कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम

**मंत्री आदिती तटकरे यांची उपस्थिती**

**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रयत्नाने रोहा एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर असोसिएशनच्या ज्युनिअर कॉलेज येथे आंथिया केमिक्लस कंपनीच्या सीएसआर फंडातून दोन वर्ग खोल्या, ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशनच्या वतीने लॅब, ओएनजीसी संस्थेकडून मुलींसाठी शौचालय या वास्तूचे लोकार्पण व दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम झाला. या वेळी महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी मेमन जमातचे अध्यक्ष इकबाल मेमन ऑफिसर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे, आरीफ मच्छीवाला, अलखैरिया कमिटी अध्यक्ष शफी पानसरे, उपाध्यक्ष मौलाना मसरूर खान, रेवा अध्यक्ष रियाज शेटे, डॉ. फरिद चिमावकर, सुलतान पानसरे, मा. उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, जुबेर चोगले, महमद डबीर, सलीम चोगले, उस्मान रोहेकर, मुबीन कर्जीकर, सरफराज बंदरकर, कादीर रोगे, निसार मोर्बेकर आदी उपस्थित होते.



या वेळी संतोष पोटफोडे यांनी रोहा अष्टमी शहरात नगरपरिषदेच्या वतीने उर्दू शाळा बांधण्यासाठी ६५ लाख रुपये दिले. जागा नसताना खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून आज उर्दू शाळेची इमारत आहे. इकबाल मेमन ऑफिसर यांनी या वृक्षाचे आतापर्यंत फळे अनेकांनी खाल्ली आहेत. आता फळे खात आहेत. पुढील पिढीसुध्दा फळे खाणार आहेत. शाळेतुन पुढे जाऊन विद्यार्थी शास्त्रज्ञ, इंजिनिअर झाले तर आम्हाला आनंद होईल. रियाज शेटे यांनी प्रत्येक वेळी हक्काने खासदार तटकरे यांच्याकडे मागणी घेऊन गेल्यावर ते त्वरीत मागणी पुर्ण करतात. कनिष्ठ महाविद्यालयाच्या मान्यता पासुन ते सर्व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी खासदार सुनील तटकरे यांनी सहकार्य केल्याचे सांगितले. इक्बाल मेमन यांनी लॅब उभारणीसाठी सहकार्य केल्याचे सांगितले.

शफी पानसरे यांनी रेवाकडुन खासदार सुनील तटकरे यांच्याकडे कॉलेजची इच्छा व्यक्त केल्यानंतर ना. आदिती तटकरे यांच्या माध्यमातून त्वरीत कॉलेजला मान्यता मिळाली आहे. खासदार सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे, अनिकेत तटकरे यांनी सातत्याने आम्हाला सहकार्य केल्याचे सांगितले. उस्मान रोहेकर काही वर्षा पुर्वी बीज लावले होते. त्याचे वटवृक्षात रुपांतर झाले. सुनील तटकरे यांच्या पावलावर पाऊल ठेवुन आदीती व अनिकेत काम करीत आहेत. त्यांची कृपा आमच्यावर कायम राहावी इच्छा व्यक्त केले. या वेळी रोहा अष्टमी शहरातील लोक प्रतिनिधी, मुस्लीम समाज बांधव, रेवाचे पदाधिकारी, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

# अंजुमन महाविद्यालयात डास दिवसानिमित्त कार्यक्रम



**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा महाविद्यालयामध्ये 'जागतिक डास दिवस' याचे औचित्य साधून प्राणिशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि डी.एल.एल.ई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड शहरातील शाळांमध्ये डासांपासून होणारे आजार व डास जास्त प्रमाणात होऊ नये यासाठी घ्यावयाची खबरदारी यांच्यावर आधारित जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २३) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अंजुमन इस्लाम जंजिरा प्रायमरी शाळेचे तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना तसेच २४ ऑगस्ट २०२४ रोजी आंगणवाडी व नगर परिषद मराठी शाळेचे इयत्ता १ ते ७वीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा डासांपासून होणारे विविध आजारांविषयी माहिती देण्यात आली. हे जनजागृती अभियान यशस्वी करण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जावेद खान, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ. फिरोज शेख, डी. एल. एल.ई विभाग प्रमुख प्रा. रहीम बागवान यांनी विशेष प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांमध्ये हवालदार खानसा, दरोगे जैनब, कुरवले इकरा, कुरेशी शिफा, जमादार अमिना, मुकरी सानिया, पांगारकर अय्यान, हमदुले सलवा यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची दखल मुरूड पंचायत समिती व महसूल विभाग यांनीसुद्धा घेतली असून केलेल्या या विशेष कार्यक्रमाबाबत विशेष प्रशंसा करण्यात आली आहे.

# जुन्या ई-रिक्षा पुन्हा सुरू करण्याची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

जून महिन्यापासून माथेरान शहरात प्रायोगिक तत्त्वावर पर्यावरणपूरक २० ई-रिक्षा श्रमिक हातरिक्षा चालकांमार्फत चालविल्या जात आहेत. नगरपालिका माध्यमातून ठेकेदारमार्फत सुरवातीला सात ई-रिक्षा सुरू होत्या. सध्या स्थितीत त्या सात ई-रिक्षा बंद केल्या असून त्या शास्त्री हॉल येथे ठेवण्यात आल्या आहेत. ई-रिक्षा नगरपालिकेमार्फत शहरतील शासकीय कार्यालय, अधिकारी वर्ग, कर्मचारी यांना भाडेतत्वावर देऊन पुन्हा सुरू कराव्या, अशी मागणी केली जात आहे.

माथेरान पर्यटनस्थळी वर्षा पर्यटनासाठी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथे प्रायोगिक तत्वावर फक्त २० ई-रिक्षा सुरू असून वाढते पर्यटन लक्षात घेता या ई-रिक्षा सेवेसाठी अपुऱ्या पडत आहे. नगरपालिकेने येथील सर्व शासकीय खात्यांना जुन्या सात ई-रिक्षा भाडेतत्वावर दिल्यास पालिकेला उत्पन्न मिळून, ई-रिक्षांचीदेखील देखभाल होऊन त्या सुस्थितीत राहतील.

ऐन गर्दीच्या वेळी ई-रिक्षा साठी रांगा लागलेल्या असताना विविध खात्याचे अधिकारी, कर्मचारी मध्येच येऊन ई-रिक्षामध्ये बसतात त्यामुळे रिक्षा स्टँडवर पर्यटक व ई-रिक्षा कर्मचारी यांच्यात वाद होतात. याकरिता जुन्या सात ई-रिक्षा अजून काही काळ बंद ठेऊन भंगारात न काढता पुन्हा एकदा पालिकेमार्फत सुरू कराव्या, अशी मागणी येथील स्थानिक नागरिक करीत आहेत.



# महड-ताकई रस्त्यावरील खड्डे भरले

**भाजप नेते नरेश पाटील यांचा पुढाकार**

**खोपोली : प्रतिनिधी**



पेण-खोपोली रस्त्याच्या बाजूनेच अष्टविनायकापैकी वरदविनायकाच्या मंदिर महड गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वनविभागाने डांबरीकरण करू न दिल्यामुळे मोठमोठे खड्डे पडल्यामुळे पावसाळ्यात खड्यांमध्ये तलावाचे स्वरूप आल्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती. वरदविनायकाच्या मंदिरात येणारे भाविक आणि पुंडलिक मंदिरात दशक्रिया विधीसाठी येणारे नागरिक तीव्र संताप करीत होते, परंतु वनविभागाच्या आठकाठीमुळे रस्त्यावरील खड्डे भरता येत नसल्यामुळे भाजप नेते, जि.प.माजी सभापती नरेश पाटील यांनी वनविभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळेचे बुधवारी (दि. २२) खड्डे भरले आहेत. अनेक दिवसांपासून प्रलंबित प्रश्न नरेश पाटील यांनी मार्गी लावल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहे.

महड गावातून ताकई फाट्यावर जोडणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत आहे. पेण-खोपोली रस्त्याच्या जोडणारा रस्ता आहे. वरदविनायकाच्या दर्शनासाठी एक्सप्रेसवरून किंवा अलिबागला येणारे भाविक येथूनच जातात तसेच पुंडलिकाच्या मंदीरातही दशक्रिया विधीसाठी दररोज लोक येतात. त्याचप्रमाणे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, पादचाऱ्यांना चालताना तारेवरची कसरत करावी लागत होती. अंदाजे अर्धा कि.मी. रस्ता वनविभागाच्या हद्दीत असल्यामुळे रस्त्याचे डांबरीकरण करण्यास परवानगी दिली नसल्यामुळे अनेक वर्ष वाहनचालकांनी खड्ड्यांतून प्रवास करावा लागत होता. यंदा तर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे पावसाळ्यात खड्यांमध्ये तलावाचे स्वरूप आल्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती.

महड-ताकई रस्त्यावरून वरदविनायका मंदीरात दर्शनासाठी भक्त येतात तसेच दशक्रिया विधीसाठी नागरिक येतात तसेच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, पादचाऱ्यांना चालताना तारेवरची कसरत करावी लागत होती. वनविभागाच्या अधिकाऱ्यांना परिस्थिती दाखविल्यानंतर खड्डे भरण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल नरेश पाटील यांनी अभार व्यक्त केले आहे.

**अर्जंट पाहिजेत**

**पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.**

संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४

# उरण शहरातील वाहतूक कोंडी दूर करा

## नगर परिषदेसह पोलिसांना पत्रकार संघाचे निवेदन




**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

उरण शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. ही नेहमीच होणारी वाहतूक कोंडी उरणकरांसाठी मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. या वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी उरण तालुका तालुका दैनिक पत्रकार संघाच्या वतीने उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदनातून उरण शहरातील वाहतूक कोंडीच्या वाढत्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत निवेदन दिले आहे.

या वाहतूक कोंडीचा सर्वांत जास्त फटका शाळकरी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच वाहनचालक, पादचारी व सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सुट्टीच्या व सणासुदीच्या दिवशी तर या शहरात पादचाऱ्यांना चालणे फार मोठे अवघड होऊन बसते. तर वाहन चालकांना मार्ग काढताना मोठी तारेवरची कसरत करावी लागते. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिकांना या त्रासाला सामोरे जावे लागते. दरम्यान, शहरातील वाहतूक नियंत्रण करण्याची जबाबदारी ही वाहतूक विभाग व उरण नगर परिषद या प्रशासनांची ही संयुक्त जबाबदारी आहे, मात्र याकडे दोन्ही विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे.

यामुळे काही बेशिस्त वाहन चालकांचे चांगलेच फावते. आणि या वाहन चालकांकडून भर रस्त्यात चार चाकी वाहने उभी करून कोंडीत भर घातली जाते. तर दुचाकी वाहनचालक हे वारंवार बेसिस्त वाहन चालवीत कोंडीत अधिकच भर घालित आहेत. शहरात वाहतूक कोंडी नियंत्रित करताना होणारे अक्षम्य दुर्लक्ष व कारवाईची कमतरता यामुळे वाहन चालकात बेशिस्तपणा वाढला आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणेश भक्तांना गणेश उत्सवाची खरेदी करायची आहे. त्यामुळे गणेश गणेशोत्सवापूर्वी वाहतूक पोलीस व उरण नगर परिषद या दोन्ही प्रशासन विभागांनी संयुक्तपणे याची गंभीर दखल घेत कारवाई करावी, अशी मागणी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष जीवन केणी व सचिव दत्तात्रेय म्हात्रे निवेदनातून केली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक नियंत्रण करून वाहतूक कोंडीवर उपाययोजना न केल्यास नागरिकांच्या सहकार्याने २९ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता उरण तहसिल कार्यालयासमोर तीन तास तीव्र धरणे आंदोलन करण्यात येईल. असेही निवेदनातून म्हटले आहे. दरम्यान, शहरातील सम विषम वाहन पार्किंगची अंमलबजावणी करावी. तसेच शहरातील वाहतूक नियंत्रण करण्यासाठी वाईन सोबत कायमस्वरूपी पोलीस हवालदार नेमण्यात यावा. वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी अनाधिकृत बांधकामे आणि व्यावसायिकांवर कारवाई करण्यात यावी. यात छोट्या व्यावसायिकांना कमीत कमी जागेत व्यवसाय करण्याची व्यवस्था करावी, मात्र त्यांच्यावर शक्यतो कारवाई करू नये.

उरण शहरात चारचाकी आणि दुचाकी वाहनांसाठी वाहनतळाची व्यवस्था करावी. शहरात रिक्षा चालकांसाठी निश्चित स्थानकाची व्यवस्था करा. मोठ्या मालवाहू जड वाहनांवर शहरातील वर्दळीच्या काळात नियंत्रण करा. शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेस गणपती चौक व स्वामी विवेकानंद चौकात वाहतूकीवर नियंत्रण करा, अशा मागण्या ही या निवेदनातून उरण तालुका दैनिक पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. या वेळी पत्रकार संघटनेचे उपाध्यक्ष दिनेश पवार, ज्येष्ठ पत्रकार मधुकर ठाकूर, जगदीश तांडेल, प्रदीप पाटील आदी उपस्थित होते.



# पनवेलमध्ये आदिवासी भवन व क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांचे स्मारक बांधण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात आदिवासी भवन व क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांचे स्मारक बांधण्याची मागणी आदिवासी ठाकूर समाज संघटना -पनवेल यांच्या वतीने करण्यात आली आहे.

पनवेलमध्ये आदिवासी भवन व्हावे यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शासकीय दरबारी व राजकीय दरबारी पत्र व्यवहाराला सुरुवात करण्यात आली. ९ ऑगस्टच्या आदिवासी दिनाच्या दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे आदिवासी भवनची मागणी आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे अध्यक्ष धर्मा बाळू वाघ यांनी केली होती. त्याचा पाठपुरावा मागणी पत्र देण्यासाठी पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर यांना मागणी पत्राद्वारे निवेदन देण्यात आले व आदिवासी भवनाची मागणी करण्यात आली.

या वेळी आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष धर्मा वाघ, उपाध्यक्ष राघो वाघ, खजिनदार चंद्रकांत सांबरी, सदस्य गजानन वाघ, सरपंच बाळू भूतांबरा, माची प्रबळ गावप्रमुख अनंता शिद, योगेश भल्ला, विकास भवर, सह खजिनदार जना घुटे, कार्याध्यक्ष अर्जुन घुटे, सहकार्याध्यक्ष मैद्या वाघ, पांडुरंग पारधी, संपर्कप्रमुख राम चौधरी, खैरवाडी विभागीय अध्यक्ष पांडुरंग भगत, धामोळा खारघर विभाग बाळाराम पारधी, मारुती वाघमारे, माची प्रबळ गाव हरिचंद्र पारधी, उप गावप्रमुख भाऊ भूतांबरा, योगेश भला, राम भवर, पांडुरंग वारगडा, गणेश निरगुडा, फणसवाडी मंगळ्या झुगरे व माची प्रबळचे गाव कमिटी सर्व ग्रामस्थ व इतर क्षेत्रातील आदिवासी उपस्थित होते.

## निवडक

### 'विहिंप'चे आज सीबीडीत संमेलन

**नवी मुंबई :** विश्व हिंदू परिषदेच्या षष्ठपूर्ती वर्षानिमित्त हिंदू संमेलनाचे आयोजन सीबीडी सेक्टर ३ येथील वारकरी भवनमध्ये रविवारी २५ ऑगस्ट या दिवशी सायंकाळी ५ वाजता करण्यात आले आहे. या वेळी पालघर येथील हिंदू शक्ती पिठाचे पू. स्वामी भारतानंद सरस्वती महाराज हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असणार आहेत, अशी माहिती नवी मुंबई सहमंत्री स्वरूप पाटील यांनी दिली. या वेळी परिषदेच्या मागील ६० वर्षांतील कार्याचे यश आणि आज देशासह जगामध्ये हिंदु समाजा समोरील आव्हाने या विषयी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. या संमेलनात हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बेलापूर प्रखंड अध्यक्ष मुकेश गांधी यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांसह शिक्षकांना वस्तूंचे वाटप



**पनवेल :** शहरातील सद्गुरु श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्ट व श्री भगवती साई संस्थान पनवेलच्या माध्यमातून सालाबादप्रमाणे यंदाही पनवेल परिसरातील शेकडो शालेय विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकवर्गाला शालेपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेल परिसरातील शेकडो शालेय विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक वर्गांना पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते शालेपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टचे रामलाल चौधरी, राम थदानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी उपस्थितांना खाऊ तसेच प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# महिलांवरील अत्याचाराचा नवी मुंबई भाजपकडून निषेध

## सुरक्षितता, सक्षमीकरण आणि सबलीकरणाची शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी शनिवारी (दि. २४) महिलांच्या सुरक्षिततेची, सक्षमीकरणाची आणि सबलीकरणाची शपथ घेतली. त्याचबरोबर महिलांवर अत्याचार करणाऱ्या विकृत मनोवृत्तीचा मूक निषेध केला.

माजी आमदार तथा नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वात नेरूळ येथे सकाळी काळ्याफिती लावून भाजपच्या कार्यकर्त्यांनी बदलापूर, नवी मुंबई आणि राज्यातील अन्य ठिकाणी झालेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा निषेध केला. जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना महिलांच्या सुरक्षिततेची,



सक्षमीकरणाची आणि सबलीकरणाची शपथ दिली. जिल्हाध्यक्ष संदीप नाईक म्हणाले, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा आम्ही निषेध करतो. वारंवार अशा घटना होत आहेत. भविष्यात त्या घडू नये म्हणून समाजामध्ये जागृती करण्याची आवश्यकता आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी सबलीकरणासाठी आणि सक्षमीकरणासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. या अनुषंगाने प्रत्येकाने स्वतःपासून या गोष्टीची सुरुवात करावी. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्तरावर अनेक चांगल्या योजना आहेत. त्या राबविल्या गेल्या पाहिजे. महिला सन्मान, सबलीकरण, महिला सक्षमीकरण, आणि महिलांच्या सुरक्षेसाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत.

आजच्या मूक निषेधमध्ये नवी मुंबई भाजप उपाध्यक्ष रवींद्र इथापे, उपाध्यक्ष दशरथ भगत, महामंत्री नेत्रा शिर्के, महामंत्री सुरज पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा माधुरी सुतार, युवा मोर्चा अध्यक्ष अमित मेढकर, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश राय, विजय वाळुंज, सुरेश शिंदे, शितल भोईर, कल्पना छत्रे नवी मुंबई भाजपाचे महिला, युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांसह पदाधिकारी सहभागी झाले होते.

नवी मुंबई भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा माधुरी सुतार यांनी महिलांवर अत्याचार करणारी विकृत मनोवृत्ती ठेचून काढली पाहिजे असे सांगत, यासाठी समाजप्रबोधनाची गरज आवश्यक असल्याचे सांगितले. नवी मुंबई भाजप युवा मोर्चा अध्यक्ष अमित मेढकर यांनी पुरुषी विचार बदलून प्रत्येकाने माता-भगिनीच्या रक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तर भाजप महामंत्री सुरज पाटील यांनी प्रत्येकाने आपल्या घरापासून महिला सुरक्षिततेचा संकल्प करून समाजातदेखील आपली जबाबदारी पार पाडावी, असे सांगितले.

# नवीन पनवेलमध्ये धम्म प्रवचन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्धविहार आणि भारतीय बौद्ध महासभा, विभाग क्र. १४, नवीन पनवेल यांच्या वतीने गुरुवारी (दि. २२) वर्षावासनिमित्त धम्म प्रवचनाच्या कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये वज्री सुत्त या विषयावर भारतीय बौद्ध महासभा, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष महेंद्र मोरे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष किसन ढेकळे हे होते. या कार्यक्रमाचे संचालन ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी यांनी केले. या वर्षावास



कालावधीत बुद्धगया प्रतिष्ठान अंतर्गत आम्रपाली बुद्ध विहाराचे संस्थापक, अध्यक्ष माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी प्रत्येक गुरुवारी आणि प्रत्येक पौर्णिमेला आम्रपाली बुद्ध विहार, सेक्टर ०९, नवीन पनवेल येथे धम्म प्रवचन मालिकेचे आयोजन केलेले आहे. त्या कार्यक्रमाचा लाभ तेथील उपासक, उपासिका आवर्जून घेत आहेत.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई

## मुकुंद गावंड यांच्या प्रयत्नांना यश

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील २०२३ साली पावसाच्या पाण्यामुळे शेतकर्यांच्या शेतीचे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे झाले होते, परंतु १३० प्रलंबित शेतकऱ्यांचे भरपाई बाकी होती शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे, यासाठी उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी पाठपुरावा घेतले व त्यांना यश आले असून शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करण्यात आले.

मुकुंद गावंड यांनी यासंदर्भात उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांची भेट घेतली होती. त्यानुसार प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांचे पैसे काल खात्यावर जमा झाले आहेत. शेतकऱ्यांनी ह्याची खातर जाम करून घ्यावी, असे आवाहन उरण तहसीलदार कदम यांनी केले आहे.



# मॉडर्न स्कूलमध्ये शिक्षण परिषद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शिक्षकांनी एकत्र येऊन नव्या शिक्षणाचे, माहितीचे आदानप्रदान व्हावे या उद्देशाने शनिवारी (दि. २४) रयत शिक्षण संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कुल मध्ये शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

'ज्ञानरचनावादावर' आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाते. त्या धर्तीवर या कार्यशाळा घेण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी ही परिषद उपयुक्त ठरते. शनिवारी घेण्यात आलेल्या या परिषदेमध्ये पाचवी इयत्तेतील मराठी विषयाच्या कवितांना चाली लावण्यात आल्या. या वेळी शालेय स्पर्धा परीक्षा पुस्तिका, भाषिक खेळ, जादुई गणित पुस्तिका, बाल रक्षक प्रशस्त ॲप, इन्स्पायर अवोर्ड, विद्यार्थी मित्र पुस्तिका, भाषा विषयाचे अध्ययन निष्पत्ती अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या परिषदेस वाशी केंद्र समन्वयक प्रशांत म्हात्रे, शिरवणे केंद्र समन्वयक सागरनाथ भंडारी, मॉडर्न स्कूलच्या प्राचार्या सुमित्रा भोसले यांच्यासह शिरवणे व वाशी केंद्रातील प्राथमिक, माध्यमिक शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये नाट्य कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल असोसिएशनने शनिवार २१ व रविवार, २२ सप्टेंबर २०२४ रोजी दोन दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन केले असून ती सायंकाळी ४ ते ८ या वेळात पनवेल कल्चरल असोसिएशनच्या सभागृहात (व्ही. के. हायस्कूलजवळ, पनवेल) होईल.

या कार्यशाळेत नाट्यकर्मी अभिजित झुंजारराव मार्गदर्शन करणार असून यात फक्त १८ वर्षावरील केवळ २० विद्यार्थ्यांपुरताच प्रवेश मर्यादित आहे. कार्यशाळेचे शुल्क १,२०० रुपये असून प्रवेश अर्ज (गूगल फॉर्म) पाठविण्याची तारीख १० सप्टेंबर २०२४ ही आहे. सर्व शिबिरार्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

या कार्यशाळेत नाट्य अभिनयाचे प्राथमिक ज्ञान, मराठी रंगभूमीविषयी प्राथमिक माहिती, नाट्यअभिनयाचे मूळ घटक, आवाज आणि वाचिक अभिनय, शरीर आणि शरीराच्या हालचाली, भाव व्यवहार, व्यक्तिरेखाचित्रण, नाटक व रंगभूमी परिचय तसेच मराठी रंगभूमीचा धावता आढावा घेण्यात येणार असून नेपथ्य, प्रकाशयोजना, रंग-वेषभूषा, पार्श्वसंगीत नाट्यव्यवस्थापन या पाच मुख्य नाट्यपैलूंविषयी अत्यंत मौलिक, अशी माहिती देण्यात येईल.

इच्छुकांनी अधिक माहितीसाठी नाट्य प्रशिक्षण शिबिर समन्वयक मोहन हिंदूपूर यांच्याशी (८९२८२०९८३४) संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मिलिंद गोखले यांनी केले आहे.

# ब्लू पॅन्थर्सचे विविध मागण्यांसाठी निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसारख्या शहरांमध्ये वाढती लोकसंख्या लक्षात घेता शाळांचे प्रमाणही वाढले आहे बदलापूर सारख्या घटना टाळण्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर कर्मचारी यांचे पोलीस व्हेरिफिकेशन होणे गरजेचे आहे. शाळांमध्ये महत्त्वाचे ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, महिला स्वच्छतागृहाच्या शेजारी महिला कर्मचारी नेमणे, नवीन नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणे या आणि अशा अनेक मागण्यांसाठी महापालिका आयुक्त, पनवेल तहसीलदार, शहर व तालुका पोलीस ठाणे तसेच गटविकास अधिकारी पनवेल यांना निवेदन देण्यात आले.



नुकताच सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व जमाती यांच्या संदर्भात अंतर्गत उपवर्गीकरण व क्रिमीलेअर सारखे दिलेले निर्णय समाजासाठी व येणार्या पिढीसाठी हानिकारक आहेत, जाती-जातीमध्ये तेढ निर्माण होऊन फूट पडू शकते, त्यामुळे हा असंवैधानिक निर्णय तत्काळ रद्द करावा असे निवेदन उपरोक्त प्रशासनाला देण्यात आले, तसेच भूमिहीनांना भूमीहिन असल्याचा दाखला लवकरात लवकर देण्यात यावा, यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत अशा प्रकारचे निवेदन पनवेल तहसीलदार यांनाही देण्यात आले.

निवेदन देत असताना संबंधित प्रशासनाबरोबर सकारात्मक चर्चा करण्यात आली, उपरोक्त प्रशासनाने आपल्या मागण्यांचा स्वीकार करून संबंधित प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. या वेळी आंबेडकर चळवळीचे तसेच ब्ल्यू पँथर्स ग्रुपचे नरेंद्र गायकवाड, प्रवीण खंडागळे, राज सदावर्ते, विजय गायकवाड, सचिन तांबे, विजय गायकवाड, सचिन कांबळे, कुणाल लोंढे, आनंद गायकवाड, नितीन कांबळे, सुधीर पवार, नितीन शिंदे, दिनेश कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




## मनभावन...

घन सावळ सावळ मेघ
किरणांची भवती रेघ
क्षितिजाच्या वेशीवरती
पाझरली दगडी भेग

या श्रावण वेळा रुजती
रानी हिरवाई भरती
आषाढ मुरवून आल्या
निस्तेज बिया ही वरती

ओलेते गगनी अंगण
रंगांची अनवट उधळण
गुंफून सात रंगांची
आकाश खेळते धुळवड

अवनीच्या अस्तित्वाला
संजीवन देई श्रावण
चैतन्य ठसा उमटून
चर अचर फुले मनभावन



स्वाती लेले (नवीन पनवेल)

# माणगावातील वाहतूक कोंडी फुटणार

## गणेशोत्सवासाठी पोलीस, नगरपंचायत सज्ज

**माणगाव : प्रतिनिधी**

सर्वांचेच आराध्य दैवत असणाऱ्या लाडक्या गणपती बाप्पाच्या गणेशोत्सवाला अवघे १५ दिवस उरले असताना लोक कामाला लागले आहेत, तर गावाकडे जाण्यासाठी चाकरमान्यांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. यंदा माणगावमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पोलीस व नगरपंचायतचे कर्मचारी हातात हात घालून काम करणार आहेत.

माणगावातील महामार्गालगत असणारे बेकायदेशीर फेरीवाले, अतिक्रमणे हटवली जाणार आहेत. रस्त्यावर रेल्वे स्टेशन ते तीनबत्ती नाकादरम्यान दुभाजक बसविण्यात येणार आहेत. निजामपूर बाजूकडून माणगावमध्ये येणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग देण्यात येणार आहे, तर मोर्बा बाजूकडून येणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग व बसथांबे यांची व्यवस्था शहराबाहेर केली जाणार आहे. त्यामुळे बाजारपेठेत अन्य वाहनांची गर्दी होणार नाही. परिणामस्वरूप माणगावातील रस्ते मोकळा श्वास घेणार आहेत. त्यासाठी माणगाव पोलीस, नगरपंचायत व एस.टी. महामंडळ नियोजन करीत आहेत.



गणेशोत्सवानिमित्ताने मोठ्या प्रमाणात गणेशभक्त मुंबईहून कोकणात येत असतात. त्या अनुषंगाने गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर व्हावा व माणगाव बाजारपेठेत दरवर्षी होणारी वाहतूक कोंडी यंदाचे वर्षी सोडवण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व पोलीस कर्मचारी तसेच नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, वाहतूक पोलीस हे संयुक्तपणे बाजारपेठेतील वेगवेगळ्या मार्गांची पाहणी करणार आहेत. तळकोकणात जाणाऱ्या प्रवाशांना माणगाव बाजारपेठेत अडचण निर्माण होऊ नये म्हणून नियोजन केले जात आहे.

### ...तर पोलिसांकडून होणार कारवाई

**माणगाव बाजारपेठेमध्ये बॅरिकेट्स लावून वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर तसेच पर्यायी मार्गावर जागोजागी दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. बाजारपेठेत व बाजारपेठेच्या बाहेर पोलिसांचे पथक असणार आहेत. त्यामुळे वाहतुकीची लेन तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जाणार आहे. महामार्गाने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. दरम्यानच्या काळात बाजारपेठेत अनधिकृत पार्किंग केल्यास वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी केले आहे.**

या मार्गावर वाहने पार्किंग न करता अन्य ठिकाणी पर्यायी व्यवस्था पार्किंगची करण्याची सोय आखली जात आहे. महामार्गालगत असणाऱ्या गटाराच्या पाठीमागे असलेल्या हातगाड्या हटविल्या जाणार आहेत तसेच रस्त्यालगत खोदलेले नाले, गटारे, ठेकेदारामार्फत भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबई बाजूकडून येणाऱ्या परिवहन बससाठी माणगावबाहेर बस स्टॉप उभारला जाणार आहे, जेणेकरून बसस्थानकात जाणाऱ्या बसमुळे वाहतूक कोंडी होणार नाही तसेच बाजारपेठेतील रिक्षा स्टॉपवर एकच रिक्षा उभी असणार असून बाकी उर्वरित रिक्षा बाजूला असणार आहेत. नंबर आल्यानंतर एक-एक रिक्षा प्रवाशांसाठी उभी असेल. मुख्य बाजारपेठेत स्पीकरवरून सूचना दिल्या जाणार आहेत.

## लग्नाचे प्रलोभन दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### पीडिता गर्भवती; तरुण ताब्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

बदलापूरची घटना ताजी असताना कर्जत तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला. अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून नराधमाने तिच्यावर वारंवार अत्याचार केले. यातून अल्पवयीन पीडित मुलगी ही गर्भवती राहिली आहे. घटनेची माहिती मिळताच आरोपी तरुणाला नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील साळोख परिसरात ही घटना घडली.अल्पवयीन मुलगी कामावर जात असताना तेथील एका तरुणाने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि लग्नाचे प्रलोभन दाखवून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. यातून अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्याने घटना उजेडात आली. पीडित मुलीने नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केल्याने घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी आरोपी तरुणास अटक करून न्यायालयात हजर केले असता २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या घटनेत नेरळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय. संहिता. २०२३चे कलम ६९, पोक्सो कलम अंतर्गत ४,६ ६९, ४,६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस प्राची पांगे करीत आहेत.

# दबावाला बळी न पडता नि:पक्षपातीपणे काम करा -न्या. अभय ओक

**अलिबाग : प्रतिनिधी**

घटनेने दिलेले सर्वसामान्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे ही न्यायव्यवस्थेत काम करणाऱ्या वकीलांची व न्याधीशांची जबाबदारी आहे. त्यामुळे या व्यवस्थेत काम करणाऱ्यांनी झुंडशाही व कोणत्याही दबावाला बळी न पडता नि:पक्षपातीपणे काम केले पाहिजे, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी शनिवारी (दि.२४) येथे व्यक्त केले.

रायगड जिल्हा आणि अलिबाग बार असोसिएशन यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांचे 'जिल्हा व तालुका न्यायालयांचे न्याय व्यवस्थेतील महत्त्व' या विषयावर व्याख्यान कुरूळच्या क्षात्रैक्य सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर.आय. छागला, एम.एम. साठ्ये, रायगडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.एस. राजंदेकर , बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे उपाध्यक्ष ॲड. उदय वारूंजीकर, सदस्य ॲड. गजानन चव्हाण, ॲड. विठ्ठल कोंडे-देशमुख, जयंत जायभावे, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

जिल्हा व तालुका न्यायालयात सर्वसामान्य माणसे येत असतात. त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम ही न्यायालये करत असतात. त्यामुळे



आपल्या देशाच्या न्यायव्यवस्थेत ही न्यायालये महत्त्वाची आहेत. त्यांना दुय्यम न्यायालये असे संबोधणे चुकीचे आहे, असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक म्हणाले.

जिल्हा व तालुका न्यायालय ही सर्वसामान्यांची न्यायालये आहेत. त्यांच्यासाठी ही शेवटची न्यायालये असतात. ते या पुढील न्यायालयात जाऊ शकत नाहीत. याच न्यायालयांमध्ये अशिलाचे भवितव्य घडते किंवा बिघडते. त्यामुळे येथेच व्यवस्थित पुरावे नोंदवून आपल्या अशिलाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न वकिलांनी केला पाहिजे, असे न्यायमूर्ती अभय ओक यांनी सांगितले.

जिल्हा व तालुका न्यायालयात काम करणाऱ्या वकिलांनी आपणास कमी समजू नये. सर्वोच्च व उच्च न्यायालयात काम करणाऱ्या वकिलांपेक्षा आपले ज्ञान कमी आहे असे समजू नये. त्यांनी आपल्यातील न्यूनगंड काढून टाकून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, असे न्यायमूर्ती ओक यांनी सूचित केले.

सर्वसामान्यांच्या अपेक्षा न्यायालयांकडून पूर्ण होत नसल्यामुळे न्यायालयाबाबत सर्वसामान्यांच्या मनामध्ये लौकिक कमी होत चालला आहे. न्यायालयाच्या विश्वासार्हतेला तडा जात आहे. न्यायदानात उशीर होत असल्याने न्यायालयाची बदनामी होत आहे. त्यामुळे न्यायालयाची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न करा. वेळ पाळा. न्यायालयाचा वेळ वाया घालवू नका, असा सल्ला न्यायमूर्ती ओक यांनी तरुण वकिलांना दिला.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम.एम. साठ्ये म्हणाले की, न्यायालयात आपल्या अशिलाला निकाल मिळणार की न्याय मिळणार याचा विचार करा. माहिती मिळवा. ज्ञानाच्या बळावर शहाणपण कमवा. त्यातून आपली प्रगती करावी.

ॲड. उदय वारूंजीकर, ॲड. गजानन चव्हाण, ॲड. जयंत जायभावे यांनीदेखील विचार व्यक्त केले. अलिबाग बार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी प्रस्ताविक केले. ॲड. विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिव ॲड. अमित देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बोरघाटातील वाहतूक पोलिसांची आरोग्य तपासणी

**खालापूर : प्रतिनिधी**

द्रुतगती महामार्गावरील वाढते अपघात व नेहमीचीच वाहतूक कोंडी यांचा सामना बोरघाट वाहतूक मदत केंद्रातील पोलिसांना करावा लागत असतो. त्यांचे आरोग्य खणखणीत असावे व कार्यात तत्पर राहून ठणठणीत सेवा बजवावी यासाठी खोपोलीतील आरोग्य अधिकारी, डॉक्टर यांनी बोरघाटातील वाहतूक केंद्रात जाऊन आरोग्य तपासणी केली. तब्बल ६८ वाहतूक पोलिसांनी याचा लाभ घेतला.

म. पो. केंद्र बोरघाट हद्दीत डॉक्टर फॉर यु या संस्थेच्या एसबीआय संजीवनी निरंतर सेवा यांच्या विद्यमाने खालापूर ट्रक टर्मिनल येथे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराकरिता डॉ. परांजपे (कान, नाक, घसा रोगतज्ञ) डॉ. प्रकाश जाधव, डॉ. बबन नागरगोजे, डॉ. राघव, मच्छिंद्र आव्हाड (व्यवस्थापक) व नर्सिंग स्टाफ हजर होते. उपस्थित तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य शिबिराकरिता हजर असलेले पोलीस अंमलदार व म.सु. जवान यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून त्यांची कान, नाक, घसा तसेच रक्तदाब, मधुमेह चाचण्या करण्यात आल्या.



# बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा कार्यान्वित

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आपल्या आजूबाजूला आपल्याला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके तसेच सापडलेली बालके, मदतीची आवश्यकता असलेली संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरित आवश्यक मदत कोठून व कशी मिळवून देता येईल याकरिता कोठे संपर्क करावा यासाठी बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आला असल्याची माहिती महिला व बाल विकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिली.

संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीकरिता भारत सरकार महिला व बाल विकास विभाग आणि महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित करण्यात आला आहे. या सेवेंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४X७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वत: घेऊ शकतो किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठाचे नवीन अभ्यासक्रम सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्ञानगंगा घरोघरी हे ब्रीदवाक्य घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आज महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात विविध अभ्यासक्रम राबवून युवकांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देत आहे. विद्यापीठ नेहमीच विद्यार्थ्यांना गरजेनुरूप अभ्यासक्रम देण्यासाठी प्रयत्नशील आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने अनेक नवीन अभ्यासक्रम सुरू केले त्यात परिवहन व्यवस्थापन पदविका व वसतिगृह व्यवस्थापन पदविका हे दोन महत्वाचे अभ्यासक्रम आहेत. हे दोन्ही अभ्यासक्रम ॐ ग्रामण्ये इन्स्टिट्यूट फॉर एज्युकेशनल एक्सलन्स, नऱ्हे रोड, धायरीफाटा, पुणे ४१, अभ्यासकेंद्र क्र. ६२५५३ येथे सुरू होत आहेत.

शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी वसतिगृह महत्त्वाची भूमिका पार पाडतात. वसतिगृहात विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते. त्यामुळे वसतिगृह हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे. दैनंदिन कामकाजाबरोबर या ठिकाणी विद्यार्थ्यांना योगा, संस्कार, विवेक याचे धडे देणे, चांगला अभ्यास करण्यासाठी वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. त्यामुळे वसतिगृहात काम करण्यासाठी कुशल व्यवस्थापक असणे गरजेचे आहे. विद्यापीठाने सुरू केलेल्या या अभ्यासक्रमामुळे वसतिगृहाचे व्यवस्थापनात सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

कोणत्याही शाखेचा पदवीधर, एमएसडब्लू झालेले विद्यार्थी वा वसतिगृहात कार्यरत कर्मचारी, मेटर्न्स व वसतिगृहात काम करण्यासाठी उत्सुक उमेदवार या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. शाळा, महाविद्यालय, शासकीय, निमशासकीय व सामाजिक संस्थानी पाठविलेल्या उमेदवारांना प्राधान्य क्रमाने प्रवेश दिला जाणार आहे.

परिवहन सेवेत व्यवस्थापक म्हणून काम करण्यासाठी मोठ्या मनुष्यबळाची गरज आहे. रस्ते वाहतूक व्यवस्थापकाची भूमिका बहुआयामी असते, ज्यामध्ये वस्तू आणि सेवांच्या कार्यक्षम हालचालीसाठी महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांचा समावेश आहे. रस्ते वाहतूक व्यवस्थापक हे रस्त्यांद्वारे मालाच्या वाहतुकीवर देखरेख करण्यासाठी, ऑपरेशन्स सुरळीतपणे, सुरक्षितपणे आणि नियमांचे पालन करत असल्याची खात्री करण्यासाठी जबाबदार असतात. त्यांची भूमिका केवळ ड्रायव्हिंगपुरती मर्यादित नसते. यामध्ये संपूर्ण वाहतूक प्रक्रिया राबविण्यासाठी धोरणात्मक नियोजन, समन्वय आणि संसाधनांचे प्रभावी व्यवस्थापन इत्यादि बाबी समाविष्ट आहे आहेत. या सर्व बाबींचा समावेश करून परिवहन व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम तयार झालेला आहे.

परिवहन सेवेत प्रशिक्षित व्यवस्थापक उपलब्ध झाल्यास परिवहन सेवेचा दर्जा उंचावेल. प्रवाशांना चांगली सेवा मिळेल. प्रवाशांना चांगली सेवा मिळाल्यास ते खासगी वाहने वापरणार नाहीत. त्यामुळे प्रदूषण कमी होईल व वातावरण शुद्ध राहण्यास मदत होईल. विद्यापीठाने सुरू केलेला हा अभ्यासक्रम एक वर्षाचा आहे. कोणत्याही शाखेचा पदवीधर या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. तसेच डिप्लोमा धारक उमेदवाराला दोन वर्षाचा कामाचा अनुभव असल्यास त्यांनाही प्रवेश घेता येईल. एखाद्या संस्थेने नामनिर्देशित केलेल्या

उमेदवारांसाठी शिक्षणाची अट शिथिल करण्यात येईल व त्याला प्राधान्यक्रमाने अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जाईल. प्रवेशासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या www. YCMOU या संकेतस्थळावर भेट द्यावी.

# माणगावमध्ये रानभाजी महोत्सव उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

निसर्गाकडून निर्माण होणाऱ्या रानभाज्या मानवी आरोग्यासाठी गुणकारी आहेत. या भाज्यांना कोणतेही रासायनिक खत किंवा विषारी कीटकनाशक औषध फवारणी केलेली नसते. त्यामुळे या रानभाज्या मानवी आरोग्याच्या दृष्टीने खाण्यासाठी पोषक आहेत, असे प्रतिपादन माणगाव कृषी उपविभागीय अधिकारी रविशंकर कावळे यांनी माणगाव येथील रानभाजी महोत्सवात बोलताना केले.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग माणगाव कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापण यंत्रणा (आत्मा) अंतर्गत माणगाव मध्यवर्ती प्रशासकीय भवन तहसील कार्यालय सभागृहात येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन तहसीलदार दशरथ काळे यांच्या हस्ते झाले. या वेळी मान्यवरांनी रानभाज्यांच्या पाककृती स्टॉलला भेट देऊन शेतकरी गटाने सादर



केलेल्या पाककृतींची माहिती घेतली.

तालुका कृषी अधिकारी माणगाव अजय वगरे यांनी प्रास्ताविकात उपस्थित शेतकऱ्यांना मानवी आरोग्यामध्ये रानभाज्यांचे महत्त्व पटवून सांगितले तसेच रानभाज्या उत्पादक शेतकऱ्यांना तालुक्यातील गृहनिर्माण सोसायटीमध्ये रानभाजी विक्री करण्याबाबत मार्गदर्शन केले. या रानभाजी महोत्सवात भाले हायस्कूलचे शिक्षक विलास शिरसे यांनी उपस्थितांना रानभाज्यांचे औषधी महत्त्व, त्यांची ओळख इत्यादीबाबत मार्गदर्शन केले. डॉ. भावना जाधव यांनी रानभाज्यांचे मानवी आहारातील महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.

तालुका कृषी अधिकारी तळा आनंद कांबळे यांनी रानभाजी विक्री व्यवस्था, वेगवेगळ्या हंगामांमध्ये कोणत्या रानभाज्या उपलब्ध असतात याबाबत माहिती दिली. निवासी नायब तहसीलदार विपूल ढुमे यांनी रानभाज्यांची लागवड नाविन्यपूर्ण घटकांतून करण्यासाठी विविध योजना तयार करण्याबाबत सुचविले तसेच तालुका स्थरावर शेतमाल व रानभाजी विक्रीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय भाषणात उपविभागीय कृषी अधिकारी रविशंकर कावळे यांनी रानभाज्या लागवड, त्यांचे औषधी गुणधर्म, तसेच बियाणे उपलब्धतेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

इंदापूर मंडळ कृषी अधिकारी सुयश नलावडे, आत्मा यंत्रणेचे तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रमोद शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष सुरडकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गोरेगाव मंडळ कृषी अधिकारी संजय ससाने यांनी मानले. या वेळी तालुक्यातील १६५पेक्षा जास्त शेतकरी तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते.

# मुरूडच्या टीबीमुक्त ग्रामपंचायतींचा सन्मान

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पं. स. येथील तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहामध्ये टीबीमुक्त ग्रामपंचायत गुणगौरव सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ झाला. गटविकास अधिकारी डॉ. राजेंद्रकुमार खताळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांच्या हस्ते नऊ ग्रामपंचायतींचा या वेळी सन्मान करण्यात आला. या ग्रामपंचायतींमध्ये वळके, तळेखार, कोर्लई, बोर्ली, नांदगाव, वेळास्ते, वावडूंगी, शिघ्रे व आगरदांडा या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांनी, समाजातील सर्वांना एकत्र आणून क्षयरोगावरील



उपचारांसाठी मदत करणे आणि देशातील क्षयरोग निर्मूलनाला गती देणे ही प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानाची संकल्पना आहे. ही संकल्पना साध्य करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांनी, २०२५पर्यंत देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी जनचळवळीत एकत्र आणणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनाची गरज अधोरेखित करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये गावातील प्रत्येक घटकांनी भाग घेतला पाहिजे, अशी आशा व्यक्त केली.

वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत यांनी क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत पात्र होण्यासाठी जे निकष आहेत याबद्दल व क्षयरोगाविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राजेंद्र चुनेकर यांनी मानले.

# ‘गब्बर’चा क्रिकेटला अलविदा

## शिखर धवनने जाहीर केली निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा डावखुरा सलामीवीर आणि २०१३च्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या संघाचा एक भाग असलेल्या शिखर धवनने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली. धवनने शनिवारी (दि. २४) सकाळी एक्सवर एक व्हिडीओ शेअर करून याबाबत माहिती दिली.

शिखर धवनची गणना जागतिक क्रिकेटमधील यशस्वी सलामीच्या फलंदाजांमध्ये केली जाते. २०२२मध्ये बांगलादेश दौऱ्यावर खेळलेल्या वनडे मालिकेत तो भारतीय संघाकडून शेवटचा खेळला होता. आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करताना पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये शिखर धवन म्हणाला की, आज मी अशा वळणावर उभा आहे कीम जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा मला फक्त आठवणी दिसतात आणि जेव्हा मी पुढे पाहतो तेव्हा मला संपूर्ण जग दिसते. भारतासाठी खेळण्याचे माझे नेहमीच एक



ध्येय होते आणि ते पूर्ण झाले ज्यासाठी मी अनेक लोकांचा आभारी आहे.

सर्वप्रथम माझे कुटुंब, माझे बालपणीचे प्रशिक्षक तारक सिन्हा जी आणि मदन शर्मा जी यांच्या मार्गदर्शनाखाली मी क्रिकेट शिकलो. मग माझी टीम ज्यांच्यासोबत मी वर्षानुवर्षे खेळलो जिथे मला माझे कुटुंब मिळाले

> **मी आता माझ्या क्रिकेट प्रवासाचा हा अध्याय संपवत आहे. माझ्यासोबत असंख्य आठवणी घेऊन जात आहे. आपल्या सर्वांच्या प्रेमासाठी आणि समर्थनासाठी धन्यवाद! जय हिंद!**
> **–शिखर धवन**

आणि तुम्हा लोकांचे समर्थन आणि प्रेम मिळाले. कथेत पुढे जाण्यासाठी पानं उलटावी लागतात असं म्हणतात, म्हणून मीही तेच करणार आहे. मी आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करत आहे. आज माझ्या क्रिकेट प्रवासाला निरोप देताना देशासाठी खेळलो याचा मला अभिमान आहे. मला ही संधी दिल्याबद्दल मी बीसीसीआय आणि डीडीसीएचे आभार मानू इच्छितो आणि माझ्यावर खूप प्रेम करणाऱ्या माझ्या सर्व चाहत्यांचे आभार मानू इच्छितो, असेही धवनने म्हटले आहे.

धवनला भारतीय संघासाठी ३४ कसोटी, १६७ एकदिवसीय आणि ६८ टी-२० सामने खेळण्याची संधी मिळाली. त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ४०.६१ च्या सरासरीने २३१५ धावा केल्या. यात सात शतके आणि पाच अर्धशतकेही झळकावली. वनडेमध्ये धवनने ४४.११च्या सरासरीने ६७९३ धावा केल्या, ज्यात १७ शतके आणि ३९ अर्धशतकांचा समावेश आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात धवनने ११ अर्धशतकांसह २७.९२च्या सरासरीने १७५९ धावा केल्या आहेत.

देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याने धवन आता आयपीएलमध्ये खेळताना दिसणार नाही. त्याची गणना आयपीएलच्या महान खेळाडूंमध्ये केली जाते. धवनने २२२ सामन्यांमध्ये ३५.०७च्या सरासरीने ६७६८ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याच्या नावावर दोन शतके आणि ५१ अर्धशतके आहेत.



# रोहा तालुका व्हॉलीबॉल स्पर्धेत कोलाड हायस्कूलचा दबदबा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका व्हॉलीबॉल स्पर्धा कोलाड येथील द.ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूलमध्ये नुकतीच झाली. या शालेय पावसाळी स्पर्धेत यजमान हायस्कूलने मुलींच्या १४, १७ व १९ वयोगट प्रथम, तर मुलांनी १७ व १९ वयोगटात प्रथम क्रमांक मिळवत आपली दरवर्षी विजेता होण्याची परंपरा कायम राखली.

रोहा तालुका व्हॉलीबॉल स्पर्धा क्रीडा अधिकारी राजेंद्र हातनूर, सचिन निकम व तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत तालुक्यातील १५ शाळांनी आपला सहभाग नोंदवला होता. खेळाडूंनी चित्तथरारक खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेचे उद्घाटन आंबेवाडीचे सरपंच तथा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश महाबळे यांच्या हस्ते करण्यात आले, तर विजयी सर्व खेळाडूंना सुधागड एज्युकेशनच्या कार्यवाह व संचालक राजेंद्र पालवे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी कोलाड हायस्कूलचे मुख्याध्यापक सुखदेव तिरमले, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बाळा महाबळे, तालुका क्रीडा समन्वयक रवींद्र कान्हेकर, शाळेचे शिक्षक डी. आर. पाटील, वसंत थोरात, रेणुका धनावडे, निलेश बिरगावले, गोविंद कवलगे, दादासाहेब हाटे, धनंजय महाडिक, पंच सुशील शिंदे, प्राणिल करावडे, हर्षल मोकल, अलिंगर शेख, अविनाश, व्यवस्थापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराजा ट्रॉफीत सुपर ओव्हरची हॅट्ट्रिक

## अखेर हुबळी टायगर्स संघाने मारली बाजी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

टी-२० सामन्यांमध्ये अनेकदा सुपर ओव्हर पहायला मिळते, पण महाराजा ट्रॉफी केएससीए टी-२० स्पर्धेतील बंगळुरू ब्लास्टर्स आणि हुबळी टायगर्स यांच्यात सुपर ओव्हरचा विक्रम मोडला गेला. सामना टाय झाल्यानंतर सलग दोन सुपर ओव्हरमध्येदेखील सामना बरोबरीत राहिला आणि तिसऱ्या सुपर ओव्हरमध्ये सामन्याचा निकाल लागला. यामध्ये हुबळी टायगर्स संघाने अखेर बाजी मारली.

क्रिकेटच्या इतिहासात प्रथमच एकाच सामन्यात तीन सुपर ओव्हर्स पहायला मिळाल्या. हा सामना सध्या सोशल मीडियावर त्याच्या तीन रोमांचक सुपर ओव्हर्समुळे चर्चेत आहे. बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर महाराजा टी-२० ट्रॉफीमध्ये मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील बंगळुरूच्या ब्लास्टर्स आणि मनीष पांडेच्या नेतृत्वाखालील हुबळी टायगर्स यांच्यात हा सामना झाला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हुबळी टायगर्स संघाने २० षटकांत सर्वबाद १६४ धावा केल्या होत्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बंगळुरू ब्लास्टर्सचा संघही २० षटकांत १६४ धावांवर गडगडला, ज्यामुळे सामना टाय झाला. यानंतर सामन्याचा निकाल लावण्यासाठी पहिली सुपर ओव्हर खेळवण्यात आली.

या सामन्यातील पहिल्या सुपर ओव्हरमध्ये बंगळुरू ब्लास्टर्सने प्रथम फलंदाजी करत एक गडी गमावून १० धावा केल्या होत्या. आता हा सामना जिंकण्यासाठी हुबलीला ११ धावा करायच्या होत्या, पण पुन्हा एकदा स्कोअर बरोबरीत राहिला. हुबळीचा संघही केवळ १० धावा करू शकला. ज्यामुळे आता सामना दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये गेला जिथे पुन्हा एकदा दोन्ही संघांचा स्कोअर बरोबरीत राहिला. या दुसऱ्या ओव्हरमध्ये हुबळी टायगर्सने आठ धावा केल्या आणि बंगळुरू ब्लास्टर्स संघाला एक गडी गमावून केवळ आठ धावा करता आल्या.

सलग दोन सुपर ओव्हरमध्ये स्कोअर बरोबरीत राहिल्यानंतर, तिसरी सुपर ओव्हर खेळली गेली, ज्यामध्ये बंगळुरू ब्लास्टर्सने प्रथम फलंदाजी करताना एक गडी बाद १२ धावा केल्या. या वेळी प्रत्युत्तरात हुबळी टायगर्सने १३ धावा करत सामना जिंकला. अशा प्रकारे या रोमांचक सामन्याचा निकाल तीन सुपर ओव्हरमध्ये लागला.

# राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत महाराष्ट्राला सांघिक विजेतेपद

## गुरूकुल अकॅडमीचे चार खेळाडू चमकले

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशातील कानपूर येथील द स्पोर्ट्ज हब येथे इंडिया तायक्वांदो सब-ज्युनियर व कॅडेट राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा २०२४-२५ तसेच अंतिम चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन्स २०२४ (ज्युनियर-क्योरुगी) स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धांचे आयोजन इंडिया तायक्वांदो आणि उत्तर प्रदेश तायक्वांदो यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.




या स्पर्धेत गुरूकुल तायक्वांदो अकॅडमीच्या चार खेळाडूंनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी बजावली. या खेळाडूंनी आपल्या प्रखर कौशल्याने महाराष्ट्राला सांघिक विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. आयोजक उत्तर प्रदेश राज्याने उपविजेतेपद पटकावले, तर सिक्कीम संघाने तृतीय क्रमांकाचा चषक उंचावला.

अथर्व साळुंखे याने सब-ज्युनियर वयोगटातील वैयक्तिक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले तसेच स्वराली माटेकर, वियोना थेस्मा आणि श्रावणी पाटणे यांनी कॅडेट वयोगटातील मुलींच्या सांघिक स्पर्धेत कांस्यपदक पटकावले, ज्यामुळे अकॅडमीसह महाराष्ट्र संघाच्या यशात भर पडली. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तुषार सिनलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेत पदक मिळवणारे खेळाडू आता दक्षिण कोरियामध्ये होणाऱ्या ज्युनियर जागतिक अजिंक्यपद स्पर्धा २०२४ तसेच हाँगकाँगमध्ये होणाऱ्या कॅडेट, ज्युनियर व सीनियर जागतिक पुमसे अजिंक्यपद स्पर्धा २०२४साठी भारतीय संघाच्या शिबिर व निवड चाचणीसाठी पात्र ठरले आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष अनिल झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, सीईओ गफ्फार पठाण तसेच ठाणे जिल्हा तायक्वांदो संघटनेचे सचिव रोहित जाधव यांनी खेळाडू, प्रशिक्षक, अकॅडमीचे कौतुक केले.

# पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी, पनवेल महापालिका आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल



महापालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते. या स्पर्धेस विविध शाळांच्या संघांनी सहभाग घेत प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षपदामध्ये उपायुक्त भारत राठोड, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू आणि क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड, समीर रेवाळे यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेचे चिफ रेफरी पराग अंकोलेकर, असिस्टंट चिफ रेफरी म्हणून शामल डेब्बार्मा व विजय ठिक यांनी काम पाहिले. विजेत्या संघांना संजय कडू यांच्यातर्फे आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

**गटनिहाय पहिले तीन विजेते संघ**

१४ वर्षाखालील मुली-डी.ए.व्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, बालभारती पब्लिक स्कूल खारघर, महात्मा स्कूल खांदा कॉलनी; मुले-बालभारती पब्लिक स्कूल खारघर, सेंट जोसेफ हायस्कूल नवीन पनवेल, एपीजे स्कूल खारघर; १७ वर्षाखालील मुली-डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर, सेंट जोसेफ हायस्कूल नवीन पनवेल, बालभारती पब्लिक स्कूल खारघर, मुले-बालभारती पब्लिक स्कूल खारघर, एपीजे स्कूल खारघर, महात्मा स्कुल खांदा कॉलनी; १९ वर्षाखालील मुली-बालभारती पब्लिक स्कूल खारघर, डीएव्ही पब्लिक स्कूल खारघर, केएलई कळंबोली, मुले-बालभारती पब्लिक स्कूल खारघर, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, डॉ. पिल्लाई ग्लोबल स्कूल खांदा कॉलनी.



**पनवेल : आशिष नाईक मित्र मंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवाचे आमंत्रण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शनिवारी देण्यात आले. या वेळी सचिन गायकवाड, विक्रांत डिंगोरकर, गौरव कांडपिळे, अनिरुद्ध कांबळे, दर्शन आगाज उपस्थित होते. तक्का येथील संत सावळा माळी हॉलजवळ २७ ऑगस्टला हा दहीहंडी उत्सव साजरा होणार असून यामध्ये पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.**

# शाहीन आफ्रिदी बनला बाप, तर शाहीद आफ्रिदी आजोबा!

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा स्टार वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी आणि त्याची पत्नी अंशा आफ्रिदी त्यांच्या पहिल्या मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करत आहेत. शाहीन शाह आफ्रिदीची पत्नी अंशाने मुलाला जन्म दिला आहे. या जोडप्याने त्यांच्या मुलाचे नाव अली यार ठेवले आहे. आफ्रिदी कुटुंबियांनी ही गोड बातमी सोशल मीडियावर शेअर केली. त्यानंतर जगभरातील चाहते आणि हितचिंतक त्यांचे अभिनंदन करत आहेत. शाहीनचे सासरे आणि पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीसाठीही हा क्षण खास आहे, कारण तो पहिल्यांदाच आजोबा झाला आहे.

बांगलादेशविरुद्धचा पहिला कसोटी सामना संपल्यानंतर डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी कराचीला रवाना होणार आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com